रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३५४
www.ramprahar.com

◆ रविवार, १२ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मोबाइलच्या उजेडात डॉक्टरांनी वाचवले दोन जीव/२
नवी मुंबईत डासउत्पत्ती स्थानांवर कार्यवाही/६
जोकोव्हिचचे ग्रँडस्लॅम जेतेपदाचे स्वप्न भंगले/८

## मोशी दुर्घटनेतील मृतांचा आकडा सहावर



**पिंपरी :** मोशी येथील कचरा डेपो परिसरात कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत मृतांचा आकडा सहावर पोहोचला आहे. तब्बल ७२ तासांपासून सुरू असलेल्या शोध आणि बचाव मोहिमेदरम्यान शनिवारी आणखी काही मृतदेह बाहेर काढण्यात आले. आतापर्यंत ढिगाऱ्याखालून एकूण १७ जणांना बाहेर काढण्यात यश आले आहे. शोधमोहिमेदरम्यान बाहेर काढण्यात आलेल्या नागरिकांना यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी तपासणीनंतर सहा जणांना मृत घोषित केले. मृतांमध्ये अक्षय सावंत (३५), सुनील कोरके (४०), सन्नी माने (३९), महेश कुंभार (३३), नागेश गायकवाड (२६) आणि रणजीत पाटील (२२) यांचा समावेश आहे.

# वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलभक्ती -मुख्यमंत्री फडणवीस

## चरण सेवा उपक्रमाची केली पाहणी



**पुणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने आयोजित श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी वारी चरण सेवा उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ११) भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठलभक्ती असल्याचे सांगत अशा सेवाकार्यात सहभागी होणे हे मोठे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे दर्शन घेऊन व आशीर्वाद घेऊन या सेवाकार्यात सहभागी होत असल्याचा विशेष आनंद आहे. वारीत सहभागी होणारे वारकरी भगिनी-बंधू दीर्घ पायी प्रवास करून येथे पोहोचतात. त्यांचा शारीरिक शीण दूर व्हावा या उद्देशाने राबविण्यात येणारा 'चरण सेवा' उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

वारकरी संप्रदायात प्रत्येकामध्ये माऊलीचे दर्शन घेतले जाते. एकमेकांच्या चरणी नम्रतेने वंदन करण्याची परंपरा ही समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारी आहे. अशा वारकऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याची संधी मिळणे हे मोठे भाग्य असून विठुरायाच्या भक्तांची सेवा हीच विठ्ठलभक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमात तरुण स्वयंसेवक मोठ्या समर्पित भावनेने वारकऱ्यांची सेवा करत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते आणि आयोजकांचे त्यांनी अभिनंदन केले. विशेषतः आमदार सुनील कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

ग्रामविकास विभागामार्फत आधुनिक पद्धतीच्या चरण सेवा यंत्रांचीदेखील उपलब्धता करून देण्यात आली असून त्याद्वारे वारकऱ्यांना अधिक चांगली सुविधा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत आषाढी वारीच्या व्यवस्थापनात अनेक सकारात्मक बदल करण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, वारकऱ्यांसाठी जर्मन हँगरची व्यवस्था, निर्मल वारी अभियान, प्रशस्त पालखी मार्ग अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच येत्या दोन ते तीन वर्षांत पंढरपूर कॉरिडॉरचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा मानस असून भविष्यात पंढरपूरचा विकास काशी, अयोध्या आणि उज्जैनप्रमाणे आदर्श धार्मिक क्षेत्र म्हणून करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार सुनील कांबळे, हेमंत रासने आदी उपस्थित होते.

# व्हिएतनाममध्ये बोट दुर्घटना १५ भारतीयांचा मृत्यू

## २१ जणांना वाचवण्यात यश



**हनोई : वृत्तसंस्था**

व्हिएतनाममधील अतिशय लोकप्रिय अशा 'फू क्वोक' बेटाजवळ पर्यटनासाठी गेलेल्या भारतीयांवर मोठा अनर्थ ओढवला आहे. एका भीषण दुर्घटनेत पर्यटकांना घेऊन जाणारी बोट समुद्रात उलटून १५ भारतीय पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार या स्पीडबोटमध्ये एकूण ३६ जण प्रवास करत होते, ज्यामध्ये ३२ भारतीय पर्यटक आणि चार स्थानिक क्रू मेंबर्सचा समावेश होता. ही बोट 'हॉन मे रुत न्गोई' बेटाच्या परिसरातून जाताना अपघात झाला. घटनेनंतर व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने स्थानिक प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

या हृदयद्रावक घटनेची गांभीर्याने दखल घेत भारतीय दूतावासाने बोटीतील सर्व ३२ भारतीय प्रवाशांची नावे 'X' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जाहीर केली आहेत. प्रवाशांच्या नातेवाइकांना तातडीने योग्य ती माहिती आणि मदत देण्यासाठी 'हो चि मिन्ह सिटी'मधील भारताचे वाणिज्य दूतावास व 'हनोई'मधील मुख्य दूतावासात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. हो चि मिन्ह सिटी नियंत्रण कक्ष : +८४ ३६ २८१ ७९३०, +८४ ९१ ५५२ ३७ १४ आणि +८४ ३३ ४५२ ०४१४, हनोई नियंत्रण कक्ष : +८४ ९१ ३०८ ९१६५ असे मदतीसाठी संपर्क क्रमांक जारी करण्यात आले आहेत.

ही भयंकर दुर्घटना 'हॉन मे रुत' बेटापासून अवघ्या ४०० मीटर अंतरावर घडली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार बोट उलटल्याचे पाहताच आजूबाजूच्या इतर बोटींनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि प्रवाशांना पाण्याबाहेर काढण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही वेळातच व्हिएतनामचे सीमा सुरक्षा दल, नौदल, कोस्ट गार्ड आणि इतर आपत्कालीन बचाव पथके मदतीसाठी दाखल झाली, मात्र अनेक प्रवासी उलटलेल्या बोटीच्या आतच अडकल्यामुळे बचावकार्यात मोठे अडथळे निर्माण झाले होते.

स्थानिक प्रशासनाच्या माहितीनुसार बचाव पथकांच्या अथक प्रयत्नांनंतर २१ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले, मात्र दुर्दैवाने १५ पर्यटकांचे मृतदेह हाती लागले आहेत. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सखोल वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

### पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिएतनाममधील दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर शोकसंदेश जारी करीत म्हटले, व्हिएतनाममध्ये भारतीय पर्यटकांसोबत घडलेल्या या बोट दुर्घटनेची बातमी अत्यंत दुःखद आहे. ज्या कुटुंबांनी आपले आप्तस्वकीय गमावले, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. जखमी प्रवासी लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी मी प्रार्थना करतो. तसेच व्हिएतनाममधील भारतीय व वाणिज्य दूतावास बाधित कुटुंबांना शक्य ती सर्व मदत करत असून ते व्हिएतनामच्या स्थानिक प्रशासनासोबत सातत्याने संपर्कात असल्याचेही पंतप्रधानांनी स्पष्ट केले.*



**सातारा : येथील रयत शिक्षण संस्थेच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमधील रजिस्ट्रार डॉ. अरुणकुमार सकटे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते कराड येथे गुरुवारी उत्साहात साजरा झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. यावेळी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जे. के. जाधव, जनरल बॉडी सदस्य किसनराव पाटील (घोणशीकर) व ॲड. सदानंद चिंगळे, माजी सचिव प्रिं. डॉ. व्ही. एस. शिवणकर, प्रिं. डॉ. अरुण आंधळे, प्रिं. डॉ. यु. व्ही. पाटील, प्रिं. डॉ. संजय कांबळे, जनार्दन भगत शिक्षण संस्था पनवेलचे व्हॉइस चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, माजी समन्वयक डी. एस. सूर्यवंशी, स.गा.म. कॉलेजचे माजी प्रबंधक बबनराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.** **(वृत्त पान २ वर)**

## निवडक

### पोक्सो गुन्ह्यातील आरोपीने केली सहा जणांची हत्या

**हैदराबाद** : तेलंगणाच्या रंगारेड्डी जिल्ह्यात पोक्सोत बाहेर असलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्री बायको-मुलांसह सहा जणांची हत्या केली. आरोपीने स्वतःच्या पत्नी व दोन मुलांसह पाठलाग केला म्हणून तक्रार करणाऱ्या १६ वर्षीय मुलीसह तिच्या आई व आजीचाही खून केला. अटकपूर्व जामिनानंतर वैयक्तिक हमीपत्रावर त्याला जामीन मिळाला होता.

### पुन्हा भूकंपाचा धक्का; हिंगोलीत भीतीचे वातावरण

**हिंगोली :** हिंगोलीत गुरुवारी पहाटे भूकंपांच्या धक्क्यांनंतर शनिवारी (दि. ११) रात्री ११.२६ वा. पुन्हा ३.५ रिश्टर स्केलच्या भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली, वसमत व औंढा नागनाथ परिसरात असल्याची माहिती आहे. भूगर्भातून गूढ आवाज आल्याचे नागरिकांनी सांगितल्याने भीती पसरली होती. अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## माणगाव-दिघी मार्गावरील अपघातात तरुणाचा मृत्यू




**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील दिघी मार्गावर शनिवारी (दि. ११) दुपारी भीषण अपघात झाला. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मालवाहू ट्रकला भरधाव ॲक्टिवाने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने मोहतसिम धनसे (२०, रा. मोर्बा) या तरुणाचा जागीच मृत्यू, तर सूफियान बंदरकर (१९, रा. मोर्बा) गंभीर जखमी झाला. दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास मोर्बा येथून माणगावच्या दिशेने येणारी ॲक्टिवा क्र. MH ०६ CB ८५२८ निळगूण गावाच्या हद्दीत रस्त्यावर उभ्या असलेल्या मालवाहू ट्रक क्र. MH ४६ F ४४६८ला पाठीमागून धडकली. धडक इतकी भीषण होती की ॲक्टिवाचा चक्काचूर झाला.

यात ॲक्टिवावरील दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिकांच्या मदतीने दोघांनाही उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे दाखल करण्यात आले, मात्र सूफियानची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी मुंबईला हलविण्यात आले. माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातामुळे काही काळ दिघी मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मयूरभरारी...




**पोलादपूर : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील निसर्गरम्य कशेडी घाटातील धामणदिवी परिसरात राष्ट्रीय पक्षी मोर रोड क्रॉसिंग करताना दिसून आला. हिरव्यागार डोंगररांगा आणि घनदाट जंगलाच्या पार्श्वभूमीवर पिसारा फुलवून उडणाऱ्या मोराचा हा देखावा प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होता. हा सुंदर क्षण शैलेश पालकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपला आहे.**

## रायगड जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता

**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्रामीण कृषी मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ (दापोली) आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यासाठी आगामी पाच दिवसांचा हवामान अंदाज आणि कृषी सल्ला जाहीर करण्यात आला आहे. प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईकडून मिळालेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील काही दिवसांत पावसाचा जोर टप्प्याटप्प्याने वाढण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यात १२ जुलै रोजी काही ठिकाणी, १३ जुलै रोजी बऱ्याच ठिकाणी, तर १४ आणि १५ जुलै रोजी बहुतांश ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १५ ते २९ जुलैदरम्यान कोकण विभागात पर्जन्यमान आणि कमाल तापमान सरासरीएवढेच राहण्याचा अंदाज आहे. दरम्यान, हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन कोकण कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा कृषी सल्ला दिला आहे.



# महिला स्वयंसहायता गटांमुळे देशात क्रांती -राज्यपाल जिष्णू देव वर्मा

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला स्वयंसहायता गटांमुळे देशातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाला गती लाभली असून ग्रामीण आदिवासी महिलांच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाले आहेत. गावोगावींच्या महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत आहेत. हे कार्य अधिक जोमाने होण्यासाठी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

'फॉर्च्युन इंडिया' मासिकातर्फे देण्यात येणाऱ्या 'फॉर्च्युन इंडिया १०० मोस्ट पॉवरफुल वुमेन (सर्वाधिक प्रभावी महिला)' पुरस्काराचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १० जुलै रोजी मुंबई येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या उपस्थितीत झालेल्या या




कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या नव्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

विविध क्षेत्रात नेतृत्वस्थानी असलेल्या महिलांना संबोधित करताना, राज्यपाल म्हणाले की, महिला स्वयंसहायता गटांमुळे स्वतःच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून इतरांना देखील प्रोत्साहन देणाऱ्या महिला अनेक ठिकाणी उदयास आल्या आहेत.

पूर्वी बँकेत जाण्यासदेखील घाबरणाऱ्या त्रिपुरा येथील एका ग्रामीण महिलेने कालांतराने स्वतः अधिकाऱ्यांसमोर आत्मविश्वासाने पॉवर पॉईंट सादरीकरण केले त्यावेळी सर्व उपस्थित आश्चर्यचकित झाले होते. ती महिला 'बँक सखी' म्हणून आज अनेक महिलांना मदत करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांकडील अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण (एनपीए) १ टयापेक्षाही कमी आहे. महिलांकडे गेलेला पैसे सुरक्षित असतो, असे त्यांनी सांगितले. देशातील ५० टक्के नागरिक महिला असल्यामुळे त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून 'विकसित भारता'चे लक्ष्य साध्य करता येणार नाही. त्यामुळे समाजातील शेवटच्या स्तरावरील महिलेपर्यंत पोहोचून तिचे सक्षमीकरण झाले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

सुरुवातीला राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आरपी संजीव गोयंका समूहाचे उपाध्यक्ष शाश्वत गोयंका यांनी प्रास्ताविक केले तर 'फॉर्च्युन इंडिया'चे मुख्य संपादक सौरव मुजुमदार यांनी आभारप्रदर्शन केले. उदघाटन सत्राला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान, रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, कॉर्पोरेट लॉ फर्म एझेडबी अँड पार्टनर्सच्या सह संस्थापिका झिया मोदी, नीरजा बिर्ला यांसह उद्योग, व्यवसाय, बँकिंग क्षेत्रातील प्रभावी महिला उपस्थित होत्या.


# बोरमाच गावावर डोंगर कोसळला; चार दिवसांपासून रस्ता बंद

## मंत्री भरत गोगावले यांनी दिले तातडीच्या कार्यवाहीचे आदेश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर परिसरातील दुर्गम आणि डोंगराळ बोरमाच गावावर निसर्गाने अक्षरशः संकटाचा डोंगर कोसळवला आहे. गावालगतच्या डोंगरमाथ्यावरून प्रचंड दरड कोसळल्याने गावाकडे जाणारा एकमेव रस्ता पूर्णपणे बंद झाला असून, संपूर्ण गावाचा बाहेरील जगाशी संपर्क तुटला आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ग्रामस्थांमध्ये भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे.

गेल्या चार दिवसांपासून रस्त्यावर मोठमोठे दगड, माती आणि झाडांचा ढिगारा पडून असल्यामुळे कोणतेही वाहन गावात पोहोचू शकत नाही. त्यामुळे आजारी व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांसह संपूर्ण गावाला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेल्या अन्नधान्य, औषधे, दूध, गॅस आणि इतर जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी ग्रामस्थांना निजामपूर किंवा माणगावपर्यंत



अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे.

बोरमाचमध्ये सुमारे ८० घरे असून काही कुटुंबे भीतीपोटी गाव सोडून नातेवाईकांकडे गेल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. सततच्या पावसामुळे डोंगरातून आणखी दरड कोसळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने प्रत्येक क्षण ग्रामस्थांच्या मनात धास्ती निर्माण करत आहे. "रात्रभर झोप लागत नाही; पुन्हा दरड कोसळली तर काय होईल?" असा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे. या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या असून रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र दरडीचे प्रमाण मोठे असल्यामुळे अद्याप वाहतूक सुरू होऊ शकलेली नाही.

ग्रामस्थांनी राज्याचे मंत्री भरत गोगावले यांच्याकडे तातडीने नवीन आणि सुरक्षित रस्ता निर्माण करण्याची मागणी केली आहे. या मागणीची दखल घेत मंत्री भरत गोगावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले असून, लवकरच स्वतः बोरमाच गावाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी करणार असल्याचे सांगितले. गावकऱ्यांच्या अडचणी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

# मोबाइल टॉर्चच्या उजेडात डॉक्टरांनी वाचवले दोन जीव

## कर्जत तालुक्यातील दुर्गम मोहली प्राथमिक आरोग्य केंद्रातील घटना

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील मोहिली प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रीती करवंदे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एका महिलेची सुखरूप प्रसूती करून दोन जीव वाचवले. मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात ही प्रसूती यशस्वी केल्याने डॉ. प्रीती करवंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सर्वत्र कौतुक होत आहे. गंभीर अवस्थेतील मातेला प्राथमिक आरोग्य केंद्रातच नॉर्मल डिलिव्हरी करून आई आणि नवजात बाळाचे प्राण वाचविण्यात यश आले.

कर्जत तालुक्यात मुसळधार पावसामुळे महावितरणच्या यंत्रणेचे मोठे नुकसान झाले होते. अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने सलग चार दिवस वीजपुरवठा खंडित होता. त्यामुळे मोहिली प्राथमिक



आरोग्य केंद्रातील बॅटरी बॅकअपही पूर्णपणे बंद पडला होता.अशा परिस्थितीत बुधवार (८ जुलै) पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास प्रसूती वेदना सुरू झालेल्या ज्योती भालचंद्र मुकणे या वीटभट्टीवर काम करणाऱ्या मुकपे गावातील गर्भवती महिलेला मुसळधार पाऊस आणि अंधारातून रस्ते तुडवत आरोग्य केंद्रात आणण्यात आले.

रुग्णाची प्रकृती गंभीर होती. बाहेर मुसळधार पाऊस सुरू असल्याने आणि रस्त्यांची अवस्था बिकट असल्याने तिला दुसऱ्या रुग्णालयात हलविणे शक्य नव्हते. अशा वेळी रुग्णाला माघारी पाठविण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रीती करवंदे यांनी प्रसंगावधान राखत मोबाईल टॉर्चच्या उजेडात प्रसूती करण्याचा निर्णय घेतला.

या धाडसी प्रसूतीमध्ये सहकारी डॉ. उत्कर्षा मनवर, आरोग्यसेविका अंकिता भोईर आणि सफाई कामगार दक्षता रूठे इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनीही मोलाची साथ दिली. बाळाचे डोके बाहेर आले होते,त्याने आईच्या गर्भाशय मधे नैसर्गिक विधी केल्याने प्रसूती करणे जोखमीचे होते परंतु डॉक्टर करवंदे यांनी सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून महिलेने सुमारे तीन किलो वजनाच्या गोंडस बाळाला जन्म दिला.प्रसूतीनंतर आई आणि बाळ दोघेही सुरक्षित असले तरी पुढील विशेष उपचार आणि निरीक्षणासाठी त्यांना उच्चस्तरीय रुग्णालयात हलविण्यात आले.

अंधार, मुसळधार पाऊस, खंडित वीजपुरवठा, बंद पडलेला बॅटरी बॅकअप आणि मर्यादित साधनसामग्री अशा प्रतिकूल परिस्थितीतही कर्तव्याला प्राधान्य देत डॉ. प्रीती करवंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखविलेली सेवाभावाची भावना आज संपूर्ण कर्जत तालुक्यात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# डॉ. अरुणकुमार सकटे यांचा सेवापूर्ती समारंभ

**कराड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमधील रजिस्ट्रार डॉ.अरुणकुमार सकटे, यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, सातारा यांच्या हस्ते संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे हे होते.

यावेळी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जे.के.जाधव, जनरल बॉडी सदस्य किसनराव पाटील (घोणशीकर) व ॲड.सदानंद चिंगळे, माजी सचिव प्रिं.डॉ. व्ही.एस. शिवणकर,प्रिं.डॉ. अरुण आंधळे, प्रिं.डॉ.यु.व्ही.पाटील,प्रिं.डॉ.संजय कांबळे, व्हॉइस चेअरमन,जनार्दन भगत शिक्षण संस्था, पनवेल,सदस्य,जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, वाय.टी.देशमुख, माजी समन्वयक डी.एस.सूर्यवंशी, बबनराव चव्हाण, माजी प्रबंधक, स.गा.म.कॉलेज,कराड इत्यादी उपस्थित होते.

रामशेठ ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत असणारे कर्मवीर अण्णांचे योगदान अधोरेखित केले. महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात असणारे रयत शिक्षण संस्थेचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. रयतेचा परिवार हा फार मोठा असून, दोन राज्यात याचा विस्तार झालेला आहे. कर्मवीर अण्णांच्या 'कमवा व शिका' योजनेतील मी विद्यार्थी आहे. अरुणकुमार सकटे यांनी हजारो चांगले मित्र व कार्यकर्ते एकत्र सांभाळले आहेत. कर्मवीरांनी पायाला भिंगरी लावून काम केले, त्याच पद्धतीचे काम अरुणकुमार करतात. त्यांच्यामध्ये समाजाप्रती ओढ, आपुलकी आहे. समाजासाठीकाम करणारी अशी माणसे समाजाला पुढे नेतात. जगाला पुढे नेण्यासाठी काही माणसे जन्माला येतात,त्यामध्ये सकटे सरांचे नाव घ्यावे लागेल. सकटे सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कामाचे विविध पैलू त्यांनी सांगितले.

सत्कारमूर्ती रजिस्ट्रार डॉ.अरुणकुमार सकटे यांनी आपल्या सत्कार समारंभाला लोकनेते रामशेठ ठाकूर आले हे आपले भाग्य आहे, असे सांगत, खा. रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाची अनेक उदाहरणे सांगितली.छत्रपती शिवाजी कॉलेजचा काया-पालट करण्यात रामशेठ ठाकूर यांचा वाटा मोलाचा आहे. त्यांच्याबरोबर काम करताना एक ऊर्जा मिळते. कर्मवीर अण्णांचे शिक्षणाचे कार्य रामशेठ ठाकूर निष्ठेने पुढे नेत आहेत,आपल्या जीवनातील काही घटना-प्रसंग सांगत, आपल्या जीवनात असणारे रामशेठ ठाकूरांचे स्थान त्यांनी स्पष्ट केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मी जगलो. माझ्या वडिलांचे स्वप्न होते, मी शिक्षक व्हावे. रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आपण ७५ झाडे नेर्ले या ठिकाणी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सचिन जाधव, प्रमुख, स्नेहसंवर्धन समिती यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.ए.के. पाटील, आजीव सेवक, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी करून दिला. यावेळी प्रा. मेजर रवींद्र रणखांबे, ॲड. सदानंद चिंगळे, सौरभ सकटे, प्रा.डॉ. निलेश मालेकर, डॉ. डी. ए. माने, जे.के. जाधव इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. अरुणकुमार सकटे यांना यावेळी'आदर्श प्रबंध पुरस्कार' देऊन उपस्थिततांचा हस्ते सन्मानित करण्यात आले.

# अंबा नदीत आढळला परदेशी, दुर्मीळ 'अल्बिनो एलीगेटर गार' मासा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील वावे गावाजवळून वाहणाऱ्या अंबा नदीच्या पात्रात एक अत्यंत दुर्मिळ आणि वैशिष्ट्यपूर्ण मासा आढळून आला आहे. या परदेशी प्रजातीच्या माश्याचे नाव 'अल्बिनो एलीगेटर गार' असून तो चमकदार पिवळ्या आणि नारंगी रंगाचा आहे. शुक्रवारी (ता. १०) सकाळी वावे येथील स्थानिक तरुण कैलास हिलम आणि केतन म्हसके हे नेहमीप्रमाणे नदीकिनाऱ्यावर फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्या दरम्यान त्यांना नदीपात्रात हा आकर्षक रंगाचा मासा मृत अवस्थेत पडलेला दिसून आला. नदीत असा अनोखा जीव पाहताच परिसरात याविषयी मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

निसर्गातील अशा दुर्मिळ जनुकीय बदलाची (अल्बिनो अवस्था) ही जिल्ह्यातील दुसरी घटना आहे. नुकताच माणगाव शहरात अतिवृष्टीमुळे जमिनीबाहेर पडलेला पांढऱ्याशुभ्र रंगाचा अत्यंत दुर्मिळ 'अल्बिनो चंचु वाळा' हा बिनविषारी साप आढळून आला होता. त्या सापाप्रमाणेच या माशाच्या शरीरातील नैसर्गिक रंगद्रव्ये नष्ट झाल्याने त्याला हा अनोखा रंग प्राप्त झाला आहे.

वन्यजीव अभ्यासक सागर दहिंबेकर यांनी सांगितले की 'गार' प्रजातीचे मासे त्यांच्या टोकदार तोंडासाठी आणि मगरीसारख्या दिसणाऱ्या जबड्यासाठी ओळखले जातात. निसर्गामध्ये या माशांचा मूळ रंग गडद किंवा राखाडी असतो. परंतु, जनुकीय बदलांमुळे या विशिष्ट माशाचा रंग पूर्णपणे पांढरा किंवा चमकदार पिवळा-नारंगी झाला आहे. पुरामुळे कोणाच्यातरी फिश टँक मधून किंवा कोणीतरी तलावा मध्ये सोडला असेल पुराचे पाणी आत गेल्याने तो बाहेर नदीपात्रामध्ये आला असेल किंवा कोणीतरी सोडला असेल.

ही प्रजाती मूळची भारतातील नसून ती उत्तर अमेरिका आणि ब्राझीलमधील नद्यांमध्ये आढळतो. हा मासा अत्यंत झपाट्याने वाढतो. येथील नदी व तलावतील माशांसाठी तो घातक आहे. त्वचारोग झाल्याने त्याची त्वचा अशी दिसते. हा आजार दुर्मिळ आहे आणि अशाप्रकारे आजार असलेला मासा फार दिवस मोकळ्या पर्यावरणात राहू शकत नाही. कारण त्याला इतर प्राण्यांपासून धोका असतो. सदर मासा हा कोणीतरी फिश टँक मध्ये पाळण्यासाठी आणला असावा आणि त्यानंतर त्याला सांभाळणे शक्य न झाल्यामुळे नदीमध्ये सोडला असावा. असे मत्सतज्ञ नितीन निकम यांनी सांगितले.



# महागाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून वृक्षारोपण

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महागाव यांच्या मार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज व माझी वसुंधरा अभियान ७ चे माध्यमातून वृक्षारोपण कारण्यात आले .वरदायिनी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात ११ जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले आहे.

यावेळी प्रशासक तथा विस्तार अधिकारी श्रीम.पुष्पा नेरकर , कृषी विस्तार अधिकारी श्री. मुंढे , श्री.पोवार , ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा तांबडे,मंदिर ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, माजी सरपंच विठोबा साबळे ,पोलीस पाटील कमलाकर मांगले, कांतीलाल कसबळे




ग्रामस्थ मंडळ महागाव,महागाव केंद्रप्रमुख ,मुख्याध्यापक सुनिल बैकर व ग्रामपंचायत कर्मचारी या कार्यकामास उपस्थित होते.

पुष्पा नेरकर यांनी वृक्ष लागवड करणे हे पर्यावरणासाठी महत्वाचे असून प्रत्येकांनी वृक्ष लावून ते जागविले पाहिजे आणि आज आपण जे वृक्षारोपण करत आहोत ती वृक्ष जगविण्यासाठी प्रत्येकांनी प्रयत्न करणे महत्वाचे असल्याचे सांगितले.

# पाली नगर पंचायत डम्पिंग ग्राउंडसाठी महावितरणकडून ट्रान्सफार्मर, पोल मंजूर

## ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या आदेशानुसार विशेष मंजुरी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली नगर पंचायतीच्या डंपिंग ग्राऊंडसाठी अनेक वर्षांपासून वीजपुरवठ्याची समस्या प्रलंबित होती. या ठिकाणी आवश्यक वीजसुविधा नसल्यामुळे नगर पंचायतीचे कामकाज सुरळीत पार पडत नव्हते. नागरिकांच्या वारंवार मागण्या, जिल्हा महामंत्री सतीश धारप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर महावितरणच्या योजनेतून या ठिकाणी विशेष मंजुरी मिळाली आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना ताई साकोरे बोर्डीकर यांच्या आदेशानुसार पाली नगर पंचायतीच्या डंपिंग ग्राऊंडसाठी एक ट्रान्सफॉर्मर तसेच आवश्यक पोल मंजूर करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे डंपिंग ग्राऊंडसाठी वीजपुरवठा उपलब्ध होणार असून नगर पंचायतीच्या कामकाजाला गती मिळणार आहे.

या मंजुरीसाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा महामंत्री सतीश धारप यांनी सातत्याने




प्रयत्न केले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधून हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून अखेर नगर पंचायतीसाठी ही महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध झाली आहे.

पाली नगर पंचायतीच्या डंपिंग ग्राऊंडसाठी वीजपुरवठा उपलब्ध झाल्याने येथील कामकाज सुरळीत पार पडेल. कचरा व्यवस्थापनाची प्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल आणि नागरिकांना स्वच्छतेच्या दृष्टीने दिलासा मिळेल.

महावितरणच्या योजनेतून मिळालेली ही मंजुरी ही पाली नगर पंचायतीसाठी एक महत्त्वपूर्ण उपलब्धी ठरली आहे.

स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून नगर पंचायतीच्या कामकाजात सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच पाली नगरपंचायत नगराध्यक्ष पराग मेहता यांनीही या निर्णयाचे स्वागत करून नागरिकांना दिलासा मिळेल, असे मत व्यक्त केले आहे.

# एसआयआर नोंदणी फोटोग्राफरना आले अच्छे दिन; मुदत वाढवण्याची मागणी

**कळंबोली : बातमीदार**

भारत निवडणूक आयोगाकडून गणना प्रपत्र करिता केंद्र सरकारकडून एस आय आर फॉर्म भरून घेण्याची सध्या लगबग सुरू आहे.यासाठी बी एल ओन ची नेमणूक ही ठीक ठिकाणी करण्यात आली आहे. कळंबोली मधील तीन शाळांतून शनिवारी एसआयआर नोंदणीसाठी बी एल ओ बसले होते. परंतु एसआयआर फॉर्म शोधण्यासाठी मतदारांची दमछाक व धावपळ होत आहे. या फॉर्मला लावण्यासाठी पासपोर्ट साईज चा फोटो आवश्यक असल्याने आता मतदारांची धाव ही फोटोग्राफरकडे होत आहे.त्यामुळे एसआयआर च्या कामातून निश्चितपणे फोटोग्राफर न अच्छे दिन आल्याचे एकंदरीत दिसून येत आहे. सदरचा फॉर्म भरणे जरी सोपे असले तरी त्याची माहिती संकलित करणे क्लिष्ट असल्याने एस आय आर फॉर्म भरण्याची मुदत वाढवण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.



एस आय आर फॉर्म चे आता वितरण बी एल ओ यांच्या मार्फत मतदारांना देणे सुरू झाले आहे. परंतु शासनाकडून एस आर आय व मतदार नोंदणीतील माहिती छपाई करून बी एल ओ कडे कडे देण्यात आले आहेत.मोठ्या संख्येने एसआरआयचे छापील फॉर्म जमा झाले आहे परंतु त्यातून नेमके मतदारांचे त्यांच्याकडे देण्यात आलेल्या मतदारांचे अर्ज शोधून काढणे ही खूप मोठी तारेवरची कसरत संबंधित काम करणाऱ्या व्यक्तीला करावी लागत आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये सुधागड हायस्कूलच्या जुन्या व नव्या इमारती तसेच न्यू मुंबई इंग्लिश स्कूलच्या विद्यालयामध्ये शनिवारी एस आय आर चे छापील फॉर्म देणे व भरून घेण्याचे कामकाज सुरू केले. शनिवारी सकाळपासून या तिन्ही शाळांमधून नागरिकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. परंतु फॉर्म शोधायचा कसा त्यासाठी ॲप कसे वापरायचे याचे व्यवस्थित प्रशिक्षण हे नागरिकांना नसल्याने मागील निवडणुकीतील मतदार क्रमांक शोधणे खूप किचकट झाले आहे.

मतदारांनी मतदान ओळखपत्र ओळखपत्रात नमूद केलेला नंबर नुसार त्यांचा गणना प्रपत्र घ्यायचे आहे. दोन प्रतीत गणनापत्र भरताना त्यामध्ये मतदाराचे नाव, मतदारसंघ क्रमांक, यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक, आधार क्रमांक, जन्मतारीख,आई-वडिलांचे नाव व इतर माहिती भरून नजीकच्या काळात म्हणजे काढलेला पासपोर्ट साईटचा फोटो यावर चिकटवायचा आहे. त्या फॉर्ममध्ये सुद्धा प्रत्येक मतदाराचे असलेले त्यावेळचे छायाचित्र येत आहे. सद्यस्थितीतला काढलेला पासपोर्ट साईटचा फोटो त्यावर चिकटवायचा असल्याने आता सगळ्यांचा धाव ही फोटोग्राफरकडे होत असल्याने या एसआयआर च्या कामातून निश्चितपणे फोटोग्राफरना अच्छे दिन आल्याचे आता दिसून येत आहे.सदरची माहिती शासनाकडे सादर करावयाची असल्याने ती अचूक व सत्य स्थितीत भरून द्यायची आहे.

जर सदर गणनाप्रपत्रात भरलेली माहिती खोटी आढळल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० चा ४३ कलमाच्या ३१ अन्वये एक वर्षापर्यंतच्या कारावासाची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद भारत निवडणूक आयोगाने यामध्ये सुद्धा केलेली आहे.फॉर्म भरल्या नंतर दोन प्रतीत घेऊन जायचं आहे. त्यावर स्वाक्षरी करायची आहे.सदरचा फॉर्म भरून दिल्यानंतर मतदान केंद्रीय अधिकाऱ्याची त्याच्यावर स्वाक्षरी घेऊन पोहोच आपल्याकडे ठेवायची आहे.

कळंबोली मध्ये लोकप्रतिनिधींनी सुद्धा या कामासाठी मदत करण्यासाठी सरसावले आहेत. नगरसेवक रवींद्र भगत हे नागरिकांच्या मदतीसाठी धावून आल्याचे दिसून आले. सदरचे काम क्लिष्ट किचकट आणि न समजण्यासारखे असल्याने याची मुदत वाढवून देण्याची मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. एका हाऊसिंग सोसायटी मधील नागरिक अन्य दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झाल्यामुळे त्यांना शोधायचे कसे हाही मोठा यक्षप्रश्न सोसायटी धारक किंवा बी एल ओ समोर येऊन उभा ठाकला आहे.त्यामुळे हे काम कितपत लवकर पूर्ण होईल याबाबतची शंका ही नागरिक व्यक्त करीत आहेत.

## भोकरपाड्यात ८८ हजारांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

### दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने प्रतिबंधित गुटखा विक्रेत्यांविरोधात मोठी कारवाई करत पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून ८८,९६८ किमतीचा केशरयुक्त विमल पान मसाला गुटखा जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलसीबीचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांच्या पथकाने भोकरपाडा येथील किराणा दुकानावर धाड टाकली. छाप्यामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला केशरयुक्त विमल पान मसाला गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ८८,९६८ किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी नितेश ज्ञानेश्वर पाटील (रा. भोकरपाडा, ता. पनवेल) आणि दिनेश मकीजा (रा. बदलापूर) यांच्याविरुद्ध रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार रवी मुंडे, शरद फरांदे, रणजितसिंह खराडे तसेच पोलीस शिपाई प्रदीप खरात यांनी सहभाग घेतला.

## एसआयआर शिबिरास जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे यांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ कार्यक्रम सध्या १८८ पनवेल विधानसभा मतदार केंद्रात सुरू आहे. या अतंर्गत मतदारांच्या सोयीसाठी १८४ विधानसभा मतदान केंद्रावरती आज शनिवार दिनांक ११ जुलै व रविवार दिनांक १२ जुलै रोजी विशेष शिबिराचे आयोजन सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपंत करण्यात आले आहे. या अनुषंगाने खारघर येथील सेक्टर ४ मधील साई मंदिर, गोखले शाळा, ग्रीन फिंगर शाळा येथील शिबिरास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी



किशन जावळे व आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे यांनी भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी त्यांच्या समवेत अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नानासाहेब कामठे, तसेच त्या त्या केंद्रावरील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

या शिबिरांच्या ठिकाणी ५७४ बिएलओ ( बुथ लेव्हल ऑफीसर) तसेच ७३ पर्यवेक्षक व १७ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी विधानसभेच्या यादीभागानुसार मतदान केंद्रावर उपस्थित आहेत. या ठिकाणी गणना अर्जाचे (इन्युमरेशन फॉर्म) वाटप व संकलन करण्यात येत आहे. पनवेल विधानसभा मतदार संघातील एकही पात्र मतदार मतदार यादीतून वगळला जाणार नाही या करीता मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने हे विशेष पुनरीक्षण अभियान राबविण्यात येत आहे.

## एसआयआर शिबिरात मतदारांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत; मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६ कार्यक्रम सध्या १८८ पनवेल विधानसभा मतदार केंद्रात सुरू आहे. या शिबिराच्या आजच्या पहिल्या दिवशी मतदारांचा मोठा प्रतिसाद दिसून आला. तसेच यावेळी या शिबिरात सहभागी झालेल्या मतदारांचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे व आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.



या शिबिरामध्ये ५७४ बिएलओ ( बुथ लेव्हल ऑफीसर) तसेच ७३ पर्यवेक्षक व १७ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी विधानसभेच्या यादीभागानुसार मतदान केंद्रावर उपस्थित आहेत. या ठिकाणी गणना अर्जाचे (इन्युमरेशन फॉर्म) वाटप व संकलन करण्यात येत आहे. उद्या रविवार दिनांक १२ जुलै रोजी देखील हे शिबिर सुरू असणार आहे. आपली लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार यादीत नाव असणे महत्त्वाचे असल्याने मतदारांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

याबरोबरच दि. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक घराला बूथ लेव्हल अधिकारी (BLO) भेट देत आहेत. या उपक्रमास नागरिकांनी सक्रिय प्रतिसाद देऊन बीएलओंना आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी श्री. मंगेश चितळे यांनी केले

मतदारांनी स्वतः गणना अर्ज भरण्यासठी voters.eci.gov.in किंवा ECINet App वर जाऊन स्वतःचा तसेच कुटुंबातील सदस्यांचा मतदार यादीतील तपशील तपासून गणना अर्ज भरावा. तसेच शनिवारी व रविवारी मतदार नेहमी ज्या मतदान केंद्रावर मतदानासाठी जातात त्याच मतदान केंद्रावर आपले गणना अर्ज भरण्यासाठी जावे. ज्या मतदाराचे अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे नाव मतदार यादीत नसल्यास त्यांनी जन्माचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड किंवा इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत.

## वेश्याव्यवसायातून दोन बांगलादेशी महिलांसह सहा जणींची सुटका

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग वर छापा टाकून पोलिसांनी दोन बांगलादेशी महिलांसह सहा पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग येथे मॅनेजर लॉजमध्ये महिला ठेवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेतो अशी माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी बनावट ग्राहकाला पाठवले. त्याच्या सांकेतिक इशारावरून पोलिसांच्या पथकाने लॉजवर छापा टाकला.

यावेळी छाप्यामध्ये दोन बांगलादेशी महिलांसहित सहा पिडीत महिला वेश्यागमन करण्यासाठी ठेवलेल्या मिळून आल्या. मॅनेजर गामा सोनकर, कॅशियर दिपू यादव, वेटर प्रियांशू रविदास यादव, आणि रमेश शर्मा लॉज मालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या अपघातांत चार जणांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात गेल्या २४ तासात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यामध्ये पनवेलकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या लेनवर मोटरसायकलला ट्रेलरने दिलेल्या धडकेत बहिण-भावाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ डीएच २७९३ वरून प्राशु भारद्वाज सिंग (वय १८) आणि वंशिका भारद्वाज सिंग (वय २० दोघेही राहणार इंडियाबुल्स पनवेल)हे जात होते. यावेळी पनवेलकडून जेएनपीटी कडे जाणाऱ्या लेनवर ट्रेलर क्रमांक जीजे ३६ वी २६०९ वरील चालक राजीव कुमार विजयशंकर याने ट्रेलर भरधाव वेगाने चालवून मोटरसायकलला डाव्या बाजूने धडक दिली. या अपघातात मोटरसायकल वरील दोघेही खाली पडले आणि ते गंभीर जखमी होऊन त्यांचा जागी मृत्यू झाला.

तर दुसऱ्या घटनेत पनवेल जवळील खंडोबा ढाबा समोरील रोडवर पेणच्या दिशेने मयत इसम पवनकुमार सरोज (३६ रा.वडाळा) या इसमाला प्रवासी बस वरील चालकाने त्याच्या ताब्यातील बस हयगयीने व बेदरकारपणे चालवून त्याला धडक मारुन अपघात करून गाडीसह पसार झाल्याने त्यात पवनकुमार याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

तर तिसऱ्या घटनेत कळंबोली येथील फुडलँड मॉलसमोरील सिग्नल जवळ एका भरधाव ट्रकने मोटार सायकलला धडक दिल्याने मोटार सायकलस्वार त्रिलोकसिंह गुमानसिंह डांगी (६५) हे गंभीर जखमी होवून त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सीकेटीमध्ये जागतिक लोकसंख्या दिनाचे आयोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल येथे अर्थशास्त्र विभाग पनवेल, शनिवारी "जागतिक लोकसंख्या दिन" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो.डॉ. बी .एस. पाटील, यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रो.डॉ. ए .के. दीक्षित यांनी सर्व विद्यार्थ्यांना "जागतिक लोकसंख्या दिन" या विषयावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमध्ये भारताची लोकसंख्या वाढ, लोकसंख्या वाढीची कारणे, आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# रावे, केळवणे, दिघाटी, कासारगाव पुन्हा प्रकाशमान!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुसळधार पाऊस, वादळी वारे, पुराचे रौद्ररूप, भरतीमुळे वेगाने वाहणारे पाणी आणि जीवाला धोका निर्माण करणारी परिस्थिती... अशा प्रत्येक संकटावर मात करत महावितरणच्या 'प्रकाशदूतांनी' रायगड जिल्ह्यातील साई शाखेअंतर्गत येणाऱ्या केळवणे, दिघाटी, कासारभट आणि रावे या गावांचा वीजपुरवठा अवघ्या चार दिवसांत पूर्ववत करून महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी संकटाच्या काळातही सेवाभावाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे सिद्ध केले आहे.

दिनांक ६ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६.०० वाजता आलेल्या मुसळधार पाऊस व वादळामुळे पाताळगंगा नदीवरील सीमा खाडी परिसरातून जाणाऱ्या साई शाखेला वीजपुरवठा करणाऱ्या २२ केव्ही उच्चदाब वाहिनीचा जंप कट झाला. याचबरोबर रावे गावाजवळील काही वीज खांबही कोसळल्याने केळवणे, दिघाटी, कासारभट व रावे या गावांसह परिसरातील सुमारे ९,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला.

या काळात खाडी परिसरात पुराचे पाणी वेगाने वाहत होते. अनेक ठिकाणी रस्त्यांचा संपर्क तुटला होता. पाण्याचा प्रवाह इतका प्रचंड होता की घटनास्थळी पोहोचणेही मोठे आव्हान होते. मात्र, संकटाची तीव्रता लक्षात घेऊन महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी स्वतः बोटीच्या सहाय्याने पुराच्या पाण्यातून मार्ग काढला.

कमरेपेक्षा अधिक खोल पाणी, चिखल, सतत सुरू असलेला पाऊस आणि जीव धोक्यात घालणारी परिस्थिती यांचा सामना करत त्यांनी मुख्य बिघाड शोधून काढला तसेच रात्रीच्या अंधारात सुद्धा खाडीच्या पाण्यात पोहूत जाऊन दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले व केळवणे, दिघाटी आणि कासारभट या गावांसह अंदाजे ५,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा यशस्वीरित्या पूर्ववत करण्यात आला.

मात्र, रावे गावासमोरील खाडी परिसरातील परिस्थिती अधिकच बिकट होती. वीज खांब कोसळले होते आणि भरतीमुळे पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्याने तेथे तातडीने काम करणे अशक्य होते. पाण्याची पातळी कमी होण्याची वाट पाहत महावितरणचे कर्मचारी सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. हवामानात किंचित सुधारणा होताच त्यांनी पुन्हा एकदा जीवाची बाजी लावत कामाला सुरुवात केली. रावे ग्रामस्थांच्या मोलाच्या सहकार्यामुळे ९ जुलै रोजी रात्री सुमारे ८.०० वाजता तीन नवीन वीज खांब उभारून तीन रोहित्रे कार्यान्वित करण्यात आली.त्यामुळे सुमारे ९८० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत झाला.

त्यानंतर उर्वरित दुरुस्तीचे काम अखंड सुरू ठेवत १० जुलै रोजी सायंकाळी ७.०० वाजता उर्वरित वीज खांब उभारून रावे गावातील उर्वरित २२० ग्राहकांचाही वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. अशा प्रकारे सर्व फीडर आणि रोहित्रे कार्यान्वित करून साई शाखेअंतर्गत येणाऱ्या सर्व ९,५०० ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्णपणे सुरळीत करण्यात महावितरणला यश आले.

पूराचे पाणी ओसरायची वाट न पाहता, प्रतिकूल हवामानाशी दोन हात करत अंधारात गेलेल्या गावांमध्ये पुन्हा उजेड पोहोचविण्यासाठी महावितरणच्या 'प्रकाशदूतांनी' दाखविलेली तत्परता, सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठा ही केवळ तांत्रिक कामगिरी नसून संकटाच्या काळात समाजाप्रती असलेल्या त्यांच्या बांधिलकीचे जिवंत उदाहरण ठरली आहे.

या कार्याबद्दल परिसरातील नागरिकांकडून महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे तसेच विशेष म्हणून महावितरणच्या सोबतीने या कार्यात मदत करणाऱ्या रावे ग्रामस्थांच्या सहकार्याचे मनापासून कौतुक करण्यात येत आहे.

या संपूर्ण मोहिमेदरम्यान भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. संजय पाटील यांनी परिस्थितीवर सातत्याने स्वतः लक्ष ठेवून प्रत्येक टप्प्याचा आढावा घेतला. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पूरग्रस्त भागातील कामाची पाहणी केली, अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत दुरुस्तीच्या कामाचे मार्गदर्शन केले व प्रतिकूल परिस्थितीत कार्यरत असलेल्या 'प्रकाशदूतांचे' मनोबल उंचावले.



# प्रेम शास्त्र @५१ वर्ष


## देव आनंदच्या पत्नीच्या भूमिकेत चक्क बिंदू...

चित्रपटाच्या जगातील काही वेगळ्या गोष्टी आश्चर्याचा असा काही धक्का नि धसका देतात की असं का नि कसे, कशाला असा प्रश्न सतत पडत राहतो आणि मग पटकथेची गरज असे उत्तर मिळाले की ते स्वीकारावे लागले तरीही त्या धयातून सावरायला वेळ लागतो.... चित्रपट संस्कृतीतील हीदेखील एक रंजक गोष्ट.

आता तुम्हीच सांगा, "प्रेम शास्त्र" हे चित्रपटाचे नाव देव आनंदचे रुपडे, दिलखुलास व्यक्तिमत्त्व, त्याची शैली, प्रतिमा (इमेज) आणि लोकप्रियता यांना एकदम फिट्ट आहे, देव आनंद कुठेही असला तरी तो देव आनंद असे. त्याचा फेवरेट स्टुडिओ वांद्रे येथील मेहबूब स्टुडिओतील त्याच्या चित्रपटाच्या मुहूर्तांना प्रत्यक्ष हजर राहताना असा लाईव्ह अनुभव घेतला आहे....

पण वादग्रस्त विषयांवरील चित्रपटाचे दिग्दर्शक अशी ओळख निर्माण झालेल्या बाबुराव इशारा अर्थात बी. आर. इशारा दिग्दर्शित चित्रपटात देव आनंदने नायक साकारावा ही "प्रेम शास्त्र" या चित्रपटाच्या घोषणेपासूनच आश्चर्याची गोष्ट होती. त्या काळात नवीन चित्रपटाची घोषणा झाली रे झाली त्याबाबत उत्कंठा सुरू होई. या चित्रपटाची कथा वेगळी असेल, अशी अपेक्षा. या चित्रपटाचा निर्माता अमरजीत हा आनंद बंधुच्या नवकेतन फिल्म या बॅनरशी अगदी घरचे संबंध असलेला, बरं या चित्रपटात झीनत अमान नायिका आहे अशी अनेक समीकरणे जुळून आल्याने देव आनंदने हा चित्रपट स्वीकारला असावा अशी आम्ही देव आनंद भक्तांनी स्वतःचीच समजूत काढली आणि या चित्रपटाच्या रुपेरी पडद्यावरील आगमनाची अतिशय आतुरतेने वाट पाहिली. सत्तरच्या दशकापर्यंतचे चित्रपटाचं वेड हे शब्दात सांगता येणार नाही असे भन्नाट आणि भारी होते. आपल्या देशातील जनसामान्यांच्या आयुष्याला चित्रपट आणि क्रिकेटने जणू व्यापून टाकले होते, आयुष्यातील आनंदाचा तो भावनिक, मानसिक आणि काहींना बौद्धिक आधार होता. आयुष्य सोपं सुटसुटीत आणि सुंदर होण्यासाठी चित्रपट आणि क्रिकेटची आवड असावी असा एक अप्रत्यक्ष समज होता.






अमरजीत आणि देव आनंद ही जोडी नवकेतन फिल्म निर्मित 'हम दोनो' (१९६१) पासून जमलेली. अमरजीतचे दिग्दर्शन देव आनंदची दुहेरी भूमिका, साधना व नंदा अशा दोन नायिका आणि जयदेवचे श्रवणीय संगीत असा जुळून आलेला योग सुपर डुपर हिट ठरला. "हम दोनो"चे दिग्दर्शन विजय आनंदचे आहे असं म्हणणारा एक वर्ग आहे, चित्रपटाच्या श्रेयनामावलीत दिग्दर्शक म्हणून अमरजीत असेच आहे ( यू ट्यूबवर पाहू शकता) आणि हा चित्रपट रिपीट रनला प्रदर्शित होताना छापलेल्या नवीन पोस्टरवर मात्र विजय आनंदचे नाव आहे. हा बदल नवकेतन फिल्मने केला की चित्रपटाच्या वितरकांनी हा प्रश्नच आहे. तोही कधीच न सुटलेला. दिग्दर्शक अमरजीत आणि देव आनंद ही जोडी 'तीन देविया '(१९६५), 'दुनिया'(१९६८), 'गॅम्बलर'(१९७१) या चित्रपटात एकत्र आली. अमरजीत यांचे नालंदा पिक्चर्स असे चित्रपट निर्मितीचे बॅनर होते.

चित्रपट संगीताचा उत्तम कान आणि दृष्टी असलेला दिग्दर्शक हीदेखील अमरजीतची ओळख. या चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. या जोडीचा चित्रपट 'प्रेम शास्त्र'. मात्र दिग्दर्शन बी. आर. इशारा यांचे. त्या काळातील धाडसी कथानकावरील चित्रपटाचे दिग्दर्शक ही त्यांची प्रतिमा. ती त्यांना ओळख दिली,'चेतना'(१९७१) या चित्रपटाने. दोन जिवलग मित्र (शत्रुघ्न सिन्हा आणि अनिल धवन) आणि एक शरीरविक्रय करणारी स्त्री (रेहाना सुल्तान) यांच्या व्यक्तीरेखाभोवतीचा हा चित्रपट त्याच्या धाडसी पोस्टर्सपासूनच गाजला. त्यांनी जणू चित्रपट दिग्दर्शित करण्याची " फॅक्टरी" उघडली होती ( त्या काळातील रामगोपाल वर्मा म्हणूया). एक नजर (अमिताभ बच्चन आणि जया भादुरी यांचा हा सुरुवातीच्या दिवसांतील चित्रपट), दिल की राहे, एक नाव दो किनारे, हाथी के दात (त्या काळातील हा सर्वाधिक फ्लॉप चित्रपट. आमच्या गिरगावातील सेन्ट्रल चित्रपटगृहातून अवघ्या चार दिवसांत उतरवला), नयी दुनिया नये लोग, जरुरत असे अनेक मध्यममार्गी चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले. लो बजेट आणि झटपट पटपट निर्मिती ही जणू त्यांची खासियत.

काही चित्रपट सामाजिक समस्येवर तर काही तेव्हाच्या मोकळ्या ढाकळ्या स्त्री पुरुष संबंधांवर होते. काळाच्या पुढचे ते दिग्दर्शक होते.चित्रपट दिग्दर्शनाचा त्यांचा झपाटा विलक्षण होता, कधी एखाद्या चित्रपटावरून वा त्यातील दृश्यावरुन त्यांचा सेन्सॉर बोर्डाशी वाद होई. अशा विषयांवर मुद्रित माध्यमातून फोकस टाकला जाताना काही ठिकाणी वादग्रस्त दृश्यांचे फोटो आवर्जून प्रसिद्ध करत. बी. आर. इशारा यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटांची जातकुळी एकदम वेगळी होती. त्यांचे बरेच चित्रपट "फक्त प्रौढांसाठी' (ए प्रमाणपत्र) असत आणि पोस्टरवर तो 'ए' अगदी ठळकपणे दिसून येई. चित्रपट संस्कृतीतील हीदेखील एक रंजक गोष्ट. अशा अगणित छोट्या छोट्या गोष्टींनी चित्रपटाचा प्रवास सुरू आहे.

झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

चित्रपट रसिकांच्या मागील पिढीला दिग्दर्शक बी. आर. इशारा चांगलेच ज्ञात आहेत आणि त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटात देव आनंद? म्हटलं ना, चित्रपटाच्या जगात काही वेगळं घडलं बिघडलं की कुतुहल वाढते. तसंच हे. देव आनंद पहिल्यांदाच ( आणि एकदाच) असा चौकटीबाहेर) प्रेम शास्त्र हे देव आनंदच्या चित्रपटाला नाव शोभते. रुपेरी पडद्यावर प्रेम करताना पहावे ते देव आनंदला. युवतीला (अर्थात नायिकेला) आकर्षित करणे, नजरेतून, कटाक्षातून प्रेम व्यक्त करणे, नायिकेला प्रेमात पाडणे, प्रेमाने तिला चिंब चिंब करणे, तिच्यावर मनसोक्त मनमुराद प्रेम करणे, तिचं प्रेम प्राप्त करणे, त्यातून एक गोष्ट तयार होणं, त्यात प्रेम गीत संगीत असणं हे सगळे देव आनंद एके देव आनंद असं बरचसं समीकरण. प्रेम शास्त्र चित्रपटात असाच प्रेम पाक अथवा प्रेमाचा गोडवा असेल असे वाटलं तर त्यात आश्चर्य ते काय? प्रेम शास्त्र मुंबईत १२ जुलै १९७४ रोजी प्रदर्शित झाला. (मेन थिएटर मिनर्व्हा.) म्हणजे या चित्रपटाच्या प्रदर्शनास एकावन्न वर्षे पूर्ण झाली. तारखेनुसार या चित्रपटाचे अस्तित्व आहे. चित्रपटात देव आनंद एक ख्यातनाम लेखक आहे. नाव सागर शर्मा. त्याची पत्नी नीलिमा शर्मा (बिंदू). यांच्या संसारातील तणाव, वाद वगैरे वगैरे. याचं कारण नीलिमाचे बेफिकीर वागणं, दारू पिणे वगैरे वगैरे. सागर शर्मा यांचे पिता आणि त्यांची मुलगी यांच्या नात्यावरील एक पुस्तक खूपच गाजते. एका पर्यटन स्थळावर सागर शर्मा यांस त्याची निस्सीम वाचक बरखा अरोरा (झीनत अमान) भेटते आणि एक नवे नाते आकार घेत घेत जाते. अनेक नाट्यमय गोष्टी घडत घडत हा चित्रपट पुढे सरकतो. या चित्रपटात रहेमान , आय. एस. जोहर, अभी भट्टाचार्य, असित सेन, अन्वर हुसेन, अंजू महेंद्र, डेव्हिड इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटाचे छायाचित्रणकार फरेदून इराणी आणि संकलन आय. एम. कन्नू. या चित्रपटाला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे आणि यातील मुझे प्यार का (पार्श्वगायक आशा भोसले आणि किशोरकुमार), टिप टिप टिप (आशा भोसले), नाम हमारा मेरा मशहूर हो गया (आशा भोसले आणि किशोरकुमार) ही गाणी लोकप्रिय झाली होती.

त्याचा चित्रपटाला काहीही फायदा झाला नाही. चित्रपट पडायचा थांबला नाही. १९७४ साली देव आनंद आणि झीनत अमान जोडीचे प्रेम शास्त्र आणि देव आनंद दिग्दर्शित 'इश्क इश्क इश्क' हे दोन्ही चित्रपट दणदणीत फ्लॉप ठरले. देव आनंदवरील प्रेमाखातर पहावे तर त्यात काही पाहण्यासारखे असावे. ही जोडी गॉसिप्स मॅगझिनमधून जास्त गाजली. एका पंचतारांकित हॉटेलमधील फिल्मी पार्टीत झीनत अमानने राज कपूरसोबत एन्ट्री करेपर्यंत आणि राज कपूर दिग्दर्शित "सत्यम शिवम सुंदरम"(१९७८) या चित्रपटासाठी झीनत अमानची निवड होईपर्यंत देव आनंद आणि झीनत अमान हॉट केक होती.सत्तरच्या दशकातील सर्वाधिक लक्षवेधक उन्मादक अभिनेत्री म्हणून झीनत अमान ओळखली गेली.

त्या काळातील जवळपास सर्वच आघाडीचे दिग्दर्शकांचे चित्रपटात (बी. आर. चोप्रा , नासिर हुसेन, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, शक्ती सामंता, प्रमोद चक्रवर्ती, जे. ओम प्रकाश , ओ. पी. रल्हन , मनोजकुमार, फिरोझ खान, संजय खान, ब्रीज) तिने भूमिका साकारली तशीच ती बी. आर. इशारा यांच्या दिग्दर्शनातील "प्रेम शास्त्र" मध्ये संधी मिळाली ही तर देव आनंदची कृपा. पण बिंदू देव आनंदच्या पत्नीच्या भूमिकेत ही गोष्ट पटकथेनुसार असली तरी न पटणारी. आणि म्हणूनच फर्स्ट डे फर्स्ट शोलाच हा चित्रपट फ्लॉप ठरला तो कायमचाच. अहो, त्यानंतर काही वर्षांनी अधूनमधून मॅटीनी शोला "प्रेम शास्त्र" प्रदर्शित झाला, पण या चित्रपटात देव आनंद आणि बिंदू पती-पत्नी असल्याने तेव्हाही कोणी नाही पाहिला. एखादा चित्रपट असादेखील असतो.

# जागतिक पटलावर पोहचणार आषाढी वारीचा आध्यात्मिक वारसा!




महाराष्ट्राची संतपरंपरा, वारकरी संप्रदायाची अखंड भक्ती आणि आषाढी वारीचा अलौकिक सोहळा ही महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक वारशाची ओळख आहे. वारी ही केवळ लाखो पावलांची यात्रा नसून मानवता, समता, बंधुभाव आणि सामूहिकतेचा संदेश देणारा महाराष्ट्राचा निर्मळ झरा आहे. या परंपरेविषयी असलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धा, संवेदनशीलता आणि बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली, ती माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित 'पंढरपूरची वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाच्या प्रीमियर शोच्या निमित्ताने...

राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असते, तेव्हा मंत्रालयापासून विधानभवनापर्यंत प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. निर्णय, चर्चा, बैठका आणि राज्यकारभाराच्या अत्यंत व्यस्त वेळापत्रकातून एखाद्या कार्यक्रमासाठी वेळ काढणे सहज शक्य नसते, मात्र जेव्हा विषय पंढरपूरच्या वारीचा आणि संतांच्या विचारांचा असतो, तेव्हा वेळ हा अडथळा राहत नाही. राज्याच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत असतानाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः आयनॉक्स चित्रपटगृहात उपस्थित राहून हा प्रीमियर शो पाहिला. ही उपस्थिती केवळ एका औपचारिक कार्यक्रमासाठी नव्हती, तर महाराष्ट्राच्या संतपरंपरेला आणि विठ्ठलभक्तीला मुख्यमंत्र्यांनी दिलेला तो सर्वोच्च सन्मान होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वारीशी असलेले नाते केवळ कौतुकापुरते मर्यादित नाही, तर ते वारकऱ्यांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणारे लोकनेते आहेत. दरवर्षी लाखो वारकरी सुरक्षित, सुसूत्र आणि आनंददायी वातावरणात वारी पूर्ण करू शकतील, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात त्यांचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. वारी मार्गावरील शुद्ध पिण्याचे पाणी, विशेष आरोग्य सुविधा, स्वच्छता, चोख सुरक्षा, वाहतूक नियोजन आणि आपत्कालीन सेवा यांसारख्या बाबींवर त्यांनी नेहमीच विशेष भर दिला आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा असल्याची भावना त्यांच्या कृतीतून सातत्याने दिसून येते.

'पंढरपूरची वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा माहितीपट केवळ दृश्य माध्यमातील कलाकृती नाही, तर महाराष्ट्राच्या अध्यात्माचा एक प्रभावी दस्तऐवज आहे. मोठ्या पडद्यावर टाळ-मृदंगाचा निनाद, अभंगांचा गजर, दिंड्यांचा उत्साह आणि लाखो वारकऱ्यांच्या मुखी असलेले "ज्ञानोबा-तुकाराम"चे सूर जेव्हा गुंजले, तेव्हा प्रेक्षकांना जणू प्रत्यक्ष वारीत चालत असल्याची अनुभूती आली. चित्रपटगृह काही क्षणांसाठी पंढरपूरच्या वारीतच रूपांतरित झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या विशेष उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, आषाढी वारीचा हा अद्वितीय सांस्कृतिक वारसा जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने २२ मिनिटांचा इंग्रजी माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला समता व भक्तीचा संदेश आता भाषेच्या मर्यादा ओलांडून जागतिक स्तरावर पोहोचणार आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर महाराष्ट्राची ही अमूल्य परंपरा मांडण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

राजकीय नेतृत्वाची खरी ओळख केवळ त्यांनी घेतलेल्या प्रशासकीय निर्णयांवरून होत नाही, तर आपल्या मातीशी आणि लोकसंस्कृतीशी असलेल्या त्यांच्या घट्ट नात्यातून होते. अधिवेशनाच्या व्यस्त कामकाजातून वेळ काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रीमियर शोला लावलेली हजेरी हेच दर्शवते की, वारी हा महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आणि अस्मितेचा केंद्रबिंदू आहे. राज्याचा हा गौरवशाली इतिहास आणि भक्तीचा भुई जगासमोर अधिक प्रभावीपणे यावा, हाच मुख्यमंत्र्यांच्या या उपस्थितीमागील मूळ उद्देश आणि प्रेरणा होती.

**-वर्षा फडके-आंधळे,**
उपसंचालक (वृत्त),
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

# अभिनेता दारासिंग रंधावा



दारासिंग रंधावा हे एक पंजाबी, भारतीय पहिलवान व चित्रपट-अभिनेते होते. २००३ ते २००९ या काळात ते भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर भारताच्या राज्यसभेवर निवडून गेले होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

दारासिंग यांचा जन्म १९ जानेवारी १९२८ रोजी जाट कुटुंबात झाला. त्यांचे बालपण पंजाबातील अमृतसरजवळील धर्मू चाक नावाच्या खेड्यात गेले. गावाच्या जवळपास त्यांची शेकडो एकर वडिलोपार्जित शेती होती. वयाची सतराव्या वर्षापर्यंत त्यांनी शेतात काम केले. अंगात भरपूर ताकद होती, आणि काम करण्याचा जबरदस्त आवाका होता. काही दिवसांतच दारासिंग सिंगापूरमधील भारतीय कुस्तीगीरांच्या दोन गटांचा सभासद झाले. त्यांच्या पहिल्या जाहीर कुस्तीत दारासिंग यांनी एका चिनी पहिलवानाला चितपट केले. या कुस्तीने दाराला प्रसिद्धी आणि पैसे मिळाले. आता खुराकाच्या खर्चाची सोय झाली होती. आणखी एकदोन कुस्त्या जिंकल्यावर दारासिंग यांनी पहारेकऱ्याची नोकरी सोडून दिली आणि कुस्तीवर संपूर्ण लक्ष द्यायला सुरुवात केली.

काही वर्षांनी दारासिंग सिंगापूरवरून इंडोनेशिया आणि श्रीलंका येथे गेले आणि तिथल्या पहिलवानांना हरवून भारतात (मुंबईत) आले. त्या वेळी मुंबईत युरोपीय कुस्तीगीर किंगकाँगचा बोलबाला होता. किंगकाँग आपल्या पाशवी शक्तीसाठी आणि उद्धटपणासाठी कुप्रसिद्ध होता. दारासिंगांनी मुंबईत त्याच्याशी जबरदस्त कुस्ती खेळून त्याचा पाडाव केला. किंगकाँगला हा अपमान जिव्हारी लागला आणि तो सिंगापूरला कायमसाठी निघून गेला. त्यानंतर दारासिंग युरोपात गेले भरपूर कुस्त्या खेळले आणि तिथेही त्यांनी कुस्तीत एकदाही न हरण्याचा विक्रम केला. शेवटी शेवटी १९५९मध्ये कॅनडाला जाऊन तिथे कुस्त्या मारून दारासिंग यांनी राष्ट्रकुलासाठी ठेवलेली ट्रॉफी जिंकली आणि ते भारतात परत आले.

सन १९६८नंतर दारासिंग रंधावांनी पुन्हा एकदा रोजचे ३००० जोर आणि ३००० बैठका मारायला सुरुवात केली आणि नंतर अमेरिकेत जाऊन तिथल्या जागतिक चँपियन रुफूसला हरवून जगज्जेतेपद मिळवले. पुढील दोन वर्षे हे पद त्यांच्याकडेच राहिले आणि तिसऱ्या वर्षी दुसऱ्या कुणालातरी मिळावे म्हणून दारासिंगांनी स्पर्धेत भागच घेतला नाही. वयाच्या ५३ वर्षांपर्यंत सक्रिय कुस्तीगीर राहिलेल्या दारासिंगानी आपल्या साठीत रामानंद सागरांच्या रामायण या दूरचित्रवाणीवरील मालिकेत हनुमानाची यशस्वी भूमिका केली. त्यापूर्वी त्यांनी जय बजरंग बली या चित्रपटात मारुतीचे काम केले होतेच. उतारवयात दारासिंगांनी जब वी मेट आणि शरारत या चित्रपटांत आणि क्या होगा निम्मोका या दूरचित्रवाणी मालिकेत थोड्याशी विनोदी ढंगाच्या भूमिका केल्या आहेत.

दारासिंग यांना तीन मुली आणि तीन मुलगे आहेत. मुलींची लग्ने झाली आहेत. एक मुलगा अंतिक आपला व्यवसाय करतो आणि दुसरा विंदू अभिनयाच्या क्षेत्रात आहे. कुस्तीतून आणि चित्रपटांतून निवृत्त झाल्यावर दारासिंग आपल्या रशियन पत्नीसह आणि मुलां-नातवंडांसमवेत जुहूच्या बंगल्यात वास्तव्याला होते. भारतातील अनेक शहरांत जाऊन पहिलवानांना मार्गदर्शन करण्यात आणि कुस्त्यांचे फड भरवण्यात ते सक्रिय होते. विशेष म्हणजे दारासिंग शाकाहारी होते. १२ जुलै २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार इंटरनेट)

# शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षेचे कवच ; प्रधानमंत्री पीक विमा योजना

राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल आणि अनपेक्षित संकट काळात आर्थिक दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी आयुक्तालयामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. ३ जुलै २०२६च्या शासन निर्णयानुसार चालू खरीप हंगामातील १४ मुख्य पिकांसाठी ही योजना जाहीर करण्यात आली असून शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षेचे कवच देण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. हवामान विभागाकडून पावसाच्या संदर्भात दिलेली माहिती आणि अंदाज विचारात घेता, शेतकऱ्यांच्या आर्थिक संरक्षणाच्या दृष्टीने ही पीक विमा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. जास्तीत जास्त शेतकरी बांधवांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी प्रशासनाने व्यापक प्रसिध्दी करण्यास सुरुवात केली आहे.

या योजनेंतर्गत चालू खरीप हंगामामध्ये एकूण १४ पिकांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. यामध्ये भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या पिकांसाठी शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होता येईल. विमा हप्त्याचा विचार केला, तर सर्वसाधारण पिकांसाठी शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या दोन टक्के विमा हप्ता भरून सहभाग घ्यावा लागेल, तर कापूस व कांदा या नगदी पिकांसाठी हा विमा हप्ता विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के एवढा निश्चित करण्यात आला आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम दिनांक ३१ जुलै २०२६ असून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पीक विमा पोर्टल https://pmfby.gov.in यावर ऑनलाइन पद्धतीने किंवा बँक, सामूहिक सुविधा केंद्र (CSC) आणि स्वतः शेतकरी ऑनलाइन अर्ज भरून भाग घेऊ शकतात.

यावेळच्या सुधारित योजनेत तंत्रज्ञानाचा वापर करून काही कडक नियम लागू करण्यात आले



आहेत. योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक म्हणजेच फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. यासोबतच जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधार संलग्न आर्थिक व्यवहारांसाठी आधार क्रमांक बँक खात्यास जोडलेला असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची नोंद डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत करणे बंधनकारक असून, डिजिटल क्रॉप सर्वेमधील पीक आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वेमध्ये नोंदवलेले पीकच अंतिम धरण्यात येईल. जर यामध्ये तफावत आढळली तर विमा अर्ज रद्द होईल. महत्त्वाचे म्हणजे योजनेत चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित शेतकऱ्याला पुढील पाच वर्षे कृषी विषयक योजनांपासून वंचित राहावे लागेल. याबाबत शेतकरी बांधवांनी विशेष काळजी घ्यावी.

योजनेच्या पात्रतेसाठी शेतकऱ्याकडे किमान ०.१० हेक्टर पिकाखालील क्षेत्र असणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेंमार्फत योजनेत सहभागी व्हावे, आणि जर कर्जदार शेतकरी योजनेत सहभाग घेण्यास इच्छुक नसेल तर त्याने विहित मुदतीत बँकेस लेखी कळवणे आवश्यक आहे. सामूहिक सेवा केंद्र धारकाला विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज ६० रुपये दिले जात असल्याने शेतकऱ्यांनी विमा हप्ता रकमेव्यतिरिक्त कोणतेही जादा शुल्क देण्याची आवश्यकता नाही. या संदर्भात काही अडचण आल्यास संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नजीकची बँक किंवा १४४४७ या टोल फ्री क्रमांकावर फोन करून शेतकरी माहिती व मदत मिळवू शकतात.

राज्य सरकारने या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यानुसार नामांकित विमा कंपन्यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार अहिल्यानगर, नाशिक, चंद्रपूर, नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड, यवतमाळ, अमरावती आणि गडचिरोली या जिल्ह्यांसाठी इफ्को टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी कार्यरत राहील. सोलापूर, जळगाव, सातारा, हिंगोली, अकोला, धुळे आणि पुणे या जिल्ह्यांसाठी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. परभणी, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांची जबाबदारी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे सोपवण्यात आली असून, जालना, गोंदिया, कोल्हापूर, वाशिम, बुलडाणा, सांगली आणि नंदुरबार या जिल्ह्यांसाठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी काम पाहेल. याव्यतिरिक्त धाराशिव जिल्ह्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनी तर लातूर आणि बीड जिल्ह्यांसाठी एसबीआय जनरल इन्शुरन्स कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. संभाव्य नैसर्गिक संकटामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**-प्रवीण डोंगरदिवे,**
उपसंपादक,
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण विभाग

# कोकणात अतिवृष्टीने भाताचे तरवे उद्ध्वस्त!

## रोपवाटिका सडल्या, रोहू आणि आवट पद्धत ठरतेय संजीवनी

**माणगाव : बातमीदार**

यंदा कोकणात मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब आणि त्यानंतर झालेल्या सलग अतिवृष्टीमुळे भात शेती समोर मोठे संकट उभे ठाकले आहे. अनेक ठिकाणी भाताचा तरवे (रोपवाटिका) पूर्णपणे सडून गेल्या तर काही ठिकाणी पुराच्या पाण्याबरोबर वाहून गेला आहे. परिणामी हजारो शेतकऱ्यांची लावणी रखडली असून खरीप हंगाम धोक्यात येण्याची शेतकऱ्यातून भीती व्यक्त केली जात आहे. सध्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असल्याने नव्याने गादी वाफ्यावर रोपवाटिका तयार करणे जवळपास अशक्य बनले आहे. पारंपरिक पद्धतीने नवीन तरवा तयार करण्यासाठी किमान तीन ते चार आठवड्यांचा कालावधी लागणार असल्याने लावणीची योग्य वेळ निघून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत कृषी तज्ज्ञांनी 'रोहु' थेट चिखलात मोड आलेले बियाणे पेरणे आणि कोकणातील पारंपरिक 'आवट' पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्ला दिला आहे.



'रोहू' पद्धतीमध्ये कमी किंवा मध्यम कालावधीत तयार होणाऱ्या भाताच्या जातींची निवड करून बियाण्यांची योग्य प्रक्रिया केली जाते. मिठाच्या पाण्यात हलके व निकृष्ट बियाणे वेगळे केल्यानंतर निवडलेले बियाणे २४ तास पाण्यात भिजवून पुढील २४ ते ३६ तास उबदार ठिकाणी ठेवले जाते. त्यातून पांढरे सुईसारखे कोंब फुटल्यानंतर शेतातील अतिरिक्त पाण्याचा निचरा करून सपाट चिखलात हे मोड आलेले बियाणे हाताने समप्रमाणात पेरले जाते. या पद्धतीमुळे स्वतंत्र रोपवाटिकेची आवश्यकता राहत नाही व लावणीसाठी लागणारा महत्त्वाचा वेळ वाचतो. मात्र यात सुरुवातीचे चार ते पाच दिवस अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. या कालावधीत शेतात पाणी साचू न देता योग्य निचऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. अन्यथा कोंब कुजण्याचा धोका वाढतो. रोपे स्थिरावल्यानंतरच पाण्याची पातळी वाढवण्याचा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

> *माणगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता अतिवृष्टीने भाताचे तरवे मोठ्या प्रमाणावर कुजल्याचे, तर अनेक ठिकाणी पुराच्या पाण्यात वाहून गेल्याचे अत्यंत विदारक चित्र समोर आले आहे. यामुळे लावणीची वेळ हातातून निसटत असून संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात आला आहे. आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर हे दुहेरी संकट कोसळले असून शासनाने केवळ पंचनाम्यांपुरते न थांबता तातडीने विशेष मदत जाहीर करावी, पर्यायी बियाणे व रोपे मोफत उपलब्ध करून द्यावीत आणि पीकविमा व नुकसानभरपाईची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवावी.*
>
> **– पंकज तांबे, शेतकरी नेते**

# जुना मुंबई–पुणे रस्त्यावर चौक फाटा येथे वाहतूक कोंडी; दीड किमीची रांग

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार म्हणजे जुना मुंबई–पुणे रस्त्यावर चौक हद्दीत चौक फाटा येथे सकाळीच वाहतूक कोंडीने सुरुवात केली. ती सतत चालूच होती. ही वाहतूक कोंडी चौक फाटा येथून दीड किमी. लांब पुणे रस्त्यावर झाली होती. त्यामुळे स्थानिक प्रवासी यांच्यासह याच मार्गावरून प्रवास करणारे लोक वैतागले होते.



या ठिकाणी शुक्रवार सायंकाळ पासून रविवार उशिरापर्यंत वाहतूक कोंडी निर्माण होते, हे नित्याचे झाले आहे. शनिवार आणि रविवार या दोन दिवशी कर्जत तालुक्यातील, चौक कर्जत मार्गावरील व परिसरातील फॉर्म हाउस, स्वतःचे फॉर्म हाउस,रिसॉर्ट, हॉटेल या ठिकाणी जाणारी गर्दी जास्त प्रमाणात असते,या वाहतूक कोंडीचा सर्वात जास्त फटका स्थानिक रहिवाशी आणि प्रवासी यांना होत आहे. वाहतूक कोंडी चे कारण बेशिस्त पण जास्त आहे, प्रत्येकाला सर्वात पुढे जाण्याची घाई आहे. चौक कर्जत फाटा येथे दुतर्फा हॉटेल आहेत, वाईनशॉप आहे, सद्या नावारूपाला येणारी चहाची दुकान याने वाहतूक कोंडी होत आहे, असा प्राथमिक अंदाज पोलीस व्यक्त करतात, दुतर्फा असलेली हॉटेल हे वेगवेगळ्या खवय्यांची पसंती आहे, त्यामुळे एका मार्गाने येणारी गाडी वेगळ्या हॉटेल वर जाण्यासाठी दुसऱ्या मार्गावर जात असते, हा चौक एवढा रुंद आहे की उभ्या असलेल्या गाडीच्या मागून दुसरी गाडी विरुद्ध दिशेला जाताना दिसून येते, हेही कारण वाहतूक कोंडी चे आहे, चौक कर्जत मार्गावर वळण घेऊन कर्जत कडे जाताना वाहतूक कोंडी निर्माण होते, येथे चौक कर्जत मार्गावरील बस स्टॉप आहे, इको रिक्षा स्टँड आहे, आपल्या रोजी रोटी साठी गावठी फळ फळांचे विक्री करणारे गरीब रस्त्याच्या कडेला बसत असतात, वाईन शॉप वर गाडी थांबून जाणारे यांचेही प्रमाण जास्त आहे, चहा पिणारे हौसे नवसे यांच्या बेफिकिरीने वाहतूक कोंडी होत असते, असा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. या वाहतूक कोंडीचा फटका येथील हॉटेलवाल्यांनाही बसत असतो. मागच्या आठवड्यात वाहतूक सुरळीत करणाऱ्या होमगार्ड कर्मचारी यांना मारहाण झाली होती. मारहाण करणारे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मोहोपाडा : वावेघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे रवी राठोड यांची निवड झाली आहे. या निवडीमुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना नवी गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



रोहे : खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोह्यात कॅरम स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. कॅरमच्या डबल स्पर्धेत २६ जोड्यांनी भाग घेतला होता. डबल स्पर्धेतील सामन्यात विलास गुजर आणि मगबुल बडे यांचा प्रथम क्रमांक आला.

# जागतिक लोकसंख्या दिन साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर व आयुष्यमान आरोग्य मंदिर रातवड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिन शनिवार दि.११ जुलै रोजी इंदापूर परिसरातील गावातून व शाळांतून विविध जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी आरोग्य सेवक सुधीर गणपत खैरे,आरोग्य सेविका सी.एन.मोरे व कोटकर आरोग्य सेविका यांनी विद्यार्थ्यांना लोकसंख्या स्थिरीकरण, संतुलित कुटुंब,वैयक्तिक स्वच्छता,पोषण,संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध आणि निरोगी जीवनशैली याविषयी सविस्तर आरोग्य शिक्षण व मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांसाठी किरकोळ आजारांवरील औषधोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.



आरोग्य तपासणीदरम्यान रक्त नमुने घेण्यात आले.त्यानंतर आरोग्य विभागामार्फत कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. तसेच रातवड आदिवासीवाडी येथील अंगणवाडीला भेट देऊन ओआरटी कॉर्नरची पाहणी करण्यात आली. अंगणवाडी सेविका मानसी जाधव व मदतनीस कदम ताई यांनी ओआरटी कॉर्नरची माहिती दिली. डेंग्यू प्रतिबंधासाठी ठेवण्यात आलेल्या गप्पी माशांच्या टाकीचीही पाहणी करण्यात आली असून त्यातील मासे सुरक्षित व जिवंत असल्याचे आढळले.

यावेळी शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर व आयुष्यमान आरोग्य मंदिर रातवड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण होण्यास मोठी मदत झाली.

# खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी यांचा माफीनामा; ८१ वर्षीय बेबीताई यांचे उपोषण मागे

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत खालापूरच्या मुख्याधिकारी कोमल कराळे यांनी ज्येष्ठ समाजसेविका ८१ वर्षीय बेबीताई साळवी यांची माफी मागत झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केल्याने गुरुवारी होणारे उपोषण मागे घेण्यात आले.

खालापुरातील आदिवासी व सर्वसामान्य नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर उपाययोजना करणे, शंकर मंदिराजवळील विहिरीची साफसफाई करणे यासाठी मनोरमा साळवी नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे यांच्या भेटीला गेले असताना त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्यानंतर मुख्याधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी ग्रामस्थांनी केली होती. परंतु पंधरा दिवस उलटून देखील मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई न झाल्याने मनोरमा साळवी गुरुवारी ९ जुलैपासून उपोषणाला बसणार होत्या. परंतु मुख्याधिकारी यांनी उपोषण मागे घेण्याची विनंती करत गुरुवारी भेटीची वेळ दिली. यावेळी बैठकीसाठी खालापूर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पेंडसे, नवीन चंद्र घाटवळ, उमेश गावंड, नितीन पाटील, मामा भोईर, शिवानी जंगम, मंदा भोसले, राजेश देसाई, मनोज साळवी, उमेश पडवकर, राकेश गव्हाणकर, रोशन खराळ, संभाजी पाटील, विजय सावंत यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने नगरपंचायत कार्यालयत जमले होते. मुख्याधिकारी यांनी झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त करत बेबीताई यांची माफी मागितली तसेच ग्रामस्थांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत लेखी उत्तर देण्याचे कबूल केल्यानंतर वातावरण निवळले.



MEDICOVER
HOSPITALS
NAVI MUMBAI

Specialist Consultation @ Khopoli

Dr. Anup Mahajani
MBBS, MD (Medicine), DNB (Cardiology), DCCM ( JHU - USA), Diploma in Medico - Legal Cases
Consultant Interventional Cardiologist
Every Month
1st Thursday
Time: 1:00pm - 2:00pm

Dr. Dipak Ahire
MBBS, MD (Medicine), DNB (Gastroenterology), Fellowship In Advanced Endoscopy
Consultant Gastroenterologist, Hepatologist & Endoscopist
Every Month
1st Thursday
Time: 1:00pm - 2:00pm

Dr. Arvind J Vatkar
MBBS, MS (Orthopaedics), AFIH, MCh (Spine, UK) Advanced Spine Fellowships (Nottingham UK, Edge Hill University UK, Stockport UK)
Consultant Orthopaedics & Spine Surgery
Every Month
2nd Tuesday
Time: 1:00pm - 2:00pm

Dr. Amit Prakash Nagarik
MD (MED), DNB (Nephrology)
Senior Consultant Nephrologist
Every Month
2nd Thursday
Time: 1:00pm - 2:00pm

Dr. Rahul Davari
MBBS, MS (Ortho)
Consultant Orthopaedic, Arthroscopy, Sports Injuries & Joint Preservation Surgeon
Every Month
2nd & 4th Friday
Time: 2:00pm - 3:00pm

Dr. Piyush Singhania
MBBS, MS, MCh
Consultant Urologist
Every Month
4th Tuesday
Time: 1:00pm - 2:00pm

Venue : Manaswi Hospital, Khopoli / Jakhotia Hospital, Khopoli / Kulkarni Nursing Home, Khopoli
24/7 Helpline: 040 6833 4455

# २९५ अधिकाऱ्यांमुळे अनधिकृत बांधकामे

## महापालिका आयुक्तांचे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत २०१६ पासून झालेल्या ४ हजार ९४६ अनधिकृत बांधकामांसाठी महापालिकेच्या २९५ अधिकारी, कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात तसे नमूद केले आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दाखल करण्यात आलेल्या या प्रतिज्ञापत्रानंतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या असून, आठ दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



'किशोर सुंदर शेट्टी विरुद्ध नवी मुंबई महानगरपालिका व इतर' या याचिकेच्या सुनावणीदरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने १६ जून २०२६ रोजी महापालिकेला २०१६ पासून शहरात झालेल्या अनधिकृत बांधकामांची माहिती तसेच त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नावे प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महापालिका आयुक्तांनी ६ जुलै रोजी अतिरिक्त प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले.

शहरातील आठ प्रशासकीय विभागांमध्ये एकूण ४ हजार ९४६ अनधिकृत बांधकामे आढळून आल्याचे या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच त्यापैकी ३ हजार ३४२ बांधकामे २९ गावठाणांमध्ये प्रारंभ प्रमाणपत्र (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) न घेता उभारण्यात आली आहेत. तर १ हजार ६०४ बांधकामे अल्प उत्पन्न गटाच्या (एलआयजी) गृहनिर्माण वसाहतींमध्ये करण्यात आल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान या बांधकामांवर वेळेत प्रतिबंधात्मक किंवा निष्कासनाची कारवाई न केल्याबद्दल १० उपायुक्त, ९१ सहाय्यक आयुक्त, ७५ कनिष्ठ अभियंते आणि ११९ लिपिक अशा एकूण २९५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. संबंधित सर्वांना आठ दिवसांच्या आत आपली बाजू लेखी स्वरूपात मांडण्यास सांगण्यात आले आहे. त्यांच्या खुलाशानंतर पुढील प्रशासकीय कारवाईबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणात महापालिकेची पुढील भूमिका काय असणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नेरूळमधील विद्युत धक्का प्रकरण

# दोन्ही विद्यार्थिनी धोक्याबाहेर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरुळ येथील एल. पी. उड्डाणपुलाखाली पावसाच्या पाण्यातून जात असताना विद्युत प्रवाहाचा धक्का बसून गंभीर जखमी झालेल्या दोन महाविद्यालयीन विद्यार्थिनींची प्रकृती पूर्णपणे सुधारली असून त्यांना गुरुवारी (९ जुलै) रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. पाच दिवस अतिदक्षता विभागात उपचार घेतल्यानंतर दोघींवरील धोका टळल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत नेरुळ पोलिसांनी नवी मुंबई महापालिकेच्या परिमंडळ-२चे कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

१ जुलै रोजी मुसळधार पावसात १९ वर्षीय उज्ज्वला लक्ष्मण वाघ आणि १७ वर्षीय शुभांगी सुभाष बालखंडे या दोघी महाविद्यालयातून घरी परतत असताना नेरुळमधील एल. पी. उड्डाणपुलाखाली साचलेल्या पाण्यातून जात होत्या. त्यावेळी पाण्याखाली असलेल्या विद्युत प्रवाहाच्या संपर्कात आल्याने दोघींना जोरदार विजेचा धक्का बसला आणि त्या रस्त्यावर कोसळल्या. वाहतूक पोलिसांनी आणि एका रिक्षाचालकाने तत्परता दाखवत त्यांना प्रथम डी. वाय. पाटील रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर अधिक उपचारासाठी त्यांना वाशी येथील फोर्टिस हिरानंदानी रुग्णालयात हलविण्यात आले.

रुग्णालयात दाखल झाल्यानंतर दोघींना अतिदक्षता विभागात ठेवून सतत निरीक्षणाखाली उपचार करण्यात आले. विजेच्या धक्क्यानंतर उशिरानेही हृदय, मूत्रपिंड आणि स्नायूंवर गंभीर परिणाम होऊ शकतात, त्यामुळे आवश्यक त्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. उज्ज्वला वाघ हिच्या पाठीच्या भागात वेदना असल्याने अतिरिक्त तपासणी करण्यात आली. त्यामध्ये गंभीर अंतर्गत दुखापत नसल्याचे स्पष्ट झाले; मात्र स्नायू आणि मऊ ऊतींना इजा झाल्याचे निदान झाले.

# 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती शासकीय स्तरावर साजरी करावी'



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १ ऑगस्ट २०२६ रोजी जयंती येत आहे.ही जयंती नवी मुंबई महापालिका प्रशासनाने शासकीय स्तरावर साजरी करावी अशी मागणी नगरसेवक अमृत मेढकर यांनी नवी मुंबई महापौर सुजाता पाटील यांच्याकडे एका निवेदनात केली आहे.

नगरसेवक अमित मेढकर यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर सुजाता सुरज पाटील यांची नवी महानगर पालिका मुख्यालयात महापौर कार्यालयात भेट घेऊन सदर निवेदन देण्यात आले

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून वंचित, श्रमिक आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय व स्वाभिमानाचा आवाज बुलंद केला. त्यांच्या या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने भव्य स्वरूपात जयंती साजरी करावी, अशी विनंती अमित मेढकर यांनी यावेळी महापौरांना केली.

# सार्वजनिक शौचालयाचे वीजबिल न भरल्याने अंधार; नागरिकांची गैरसोय

**नवी मुंबई : बातमीदार**

सेक्टर-१२, सारसोळे बस डेपो येथील सार्वजनिक शौचालयाचे वीज बिल न भरल्याने गेल्या चार दिवसांपासून वीजपुरवठा खंडित झाला असून त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मनोज मेहेर यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल करून संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

मनोज मेहेर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सार्वजनिक शौचालयातील वीजपुरवठा बंद असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी चौकशी केली असता वीज बिल न भरल्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचे समोर आले. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी जबाबदारी स्वीकारण्याऐवजी इतर विभागांकडे बोट दाखवल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

# नवी मुंबईत बांधकाम स्थळांवरील डासउत्पत्ती स्थानांवर कार्यवाहीची विशेष मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर हे खाडीकिनारी वसलेले सुनियोजीत शहर असून इतर शहरांना रेल्वे व रस्त्याद्वारे नियोजीतपणे जोडलेले आहे. येथील नागरी वसाहत दिवसांदिवस वाढत आहे. तसेच घरांच्या वाढत्या मागणीप्रमाणे नवीन रहिवासी इमारतींची तसेच पुनर्बांधणीची बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरु आहेत.

बांधकामातील साचलेल्या पाण्यामुळे हिवताप / डेंग्यू यासारख्या आजार पसरविणाऱ्या डासांची उत्पत्ती होण्याची दाट शक्यता असते, यासाठी सदर ठिकाणी डासउत्पत्ती रोखण्याकरिता नमुंमपामार्फत विविध उपाययोजना राबविल्या जातात.

नागरी प्राथमिक आरोग्य केंदाच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात आरोग्य विभागामार्फत डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरणाचे काम केले जाते. परंतू यासोबतच पावसाळा कालावधीत घरांतर्गत डासोत्पत्ती स्थाने तपासणी व बांधकामांमध्ये डासअळीनाशक फवारणी यावर विशेष भर दिला जातो.



**बांधकामांच्या ठिकाणच्या उपाययोजना**

- बांधकामाच्या ठिकाणी नियमित कॅम्पचे नियोजन.
- बांधकामां अंतर्गत मजूरांच्या झोपड्यांमध्ये पावडर फवारणी.
- बांधकामांमध्ये नियमित ग्रॅन्युअल ट्रीटमेंट करणे. गप्पी मासे सोडणे
- इत्यादी उपाययोजना केल्या जातात.

**३,५६० मजुरांच्या घरांत पावडर फवारणी**

नमुंमपा आरोग्य विभागामार्फत बांधकामाच्या ठिकाणी नियामित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळीनाशक फवारणी केली जाते. २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय असलेल्या बांधकामाच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यानुसार नवी मुंबईत २७० बांधकामे सुरु आहेत, यापैकी १ ते ५० बांधकाम मजूर संख्या असलेली १५२ बांधकामे, ५१ ते १०० बांधकाम मजूर असलेली ४५ बांधकामे, १०० पेक्षा जास्त बांधकाम मजूर संख्या असलेली ४० बांधकामे आणि मजूर नसलेली परंतू बांधकाम सुरु होण्यापूर्वी खड्डा खोदून ठेवलेली एकूण ३३ बांधकामे आहेत.

बांधकाम कार्यक्षेत्रात एकूण २७० बांधकामांमध्ये २६५ ठिकाणी गप्पी मासे सोडले असून मागील तीन महिन्यांमध्ये एकुण ३५६० बांधकाम मजूरांच्या घरांमध्ये पावडर फवारणी करण्यात आली आहे. २७० बांधकामांमध्ये १४३९० कामगार काम करीत आहेत.

नियमित डासअळीनाशक फवारणी झाल्यावर सदर कामाची फेरतपासणी पर्यवेक्षक व अधिकारी यांचेमार्फत केले जात असून सदरचे काम प्रभावी होईल याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

तरी आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर / टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप / डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल असे आवाहन महापौर सुजाता सुरज पाटील व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोनच्या इयत्ता पाचवीतील सहा विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद (MSCE), पुणे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. यामधून कुमार आर्य निलेश म्हात्रे यांची महाराष्ट्र शासनाच्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी स्थानिक स्कूल समिती व सल्लागार समितीचे अध्यक्ष रमाकांत गावंड, उपाध्यक्ष अनंत गावंड, मुकुंद गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष आणि स्कुल कमिटी सदस्य,अनंत नारायण गावंड आणि स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य मनोहर गावंड, विलास गावंड, यांच्या हस्ते कुमार आर्य निलेश म्हात्रे याचा तुळशीचे रोप व अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या निकिता गायकवाड, स्थानिक स्कूल समितीच्या शिक्षक प्रतिनिधी नम्रता पाटील तसेच कनिष्ठ लिपिक निर्जरा म्हात्रे उपस्थित होत्या.



# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे गुणगौरव कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**


कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शाळेतील हुशार मुलांचा गुणगौरव कार्यक्रम आणि वह्या वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या योगदानाबद्दल जुन्या आठवणी काढून उजाळा दिला. यावेळी सारडे गावातील ज्येष्ठ ए डी पाटील, अक्षय ठाकूर, प्राचार्य प्रमोद म्हात्रे, उपाध्यक्ष अनिल पाटील, व शेणी गावातील ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, शाळेच्या प्राध्यापिका अर्चना पाटील, शाळेचे शिक्षक पुरण पाटील, संजय म्हात्रे, परेश पाटील, माली सर आदी शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.


श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर

वर्ष २३ वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३

# पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

**गुरुवार, दिनांक १६/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण),श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर, गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर, गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत, टाळकरी - सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर, गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ (कोपर), बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर)<br>पखवाज : वैष्णव देशमुख |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | **प्रभोदनकार :** ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे,<br>श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक : ह.भ.प. आदित्य पाटील,<br>गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻**

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

**✻ व्यवस्थापक ✻**

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

**✻ संयोजक ✻**

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

# पेण तालुक्यात मीठशेतीचे बांध उद्ध्वस्त; हजारो गोण्या मीठ आणि भात भिजला

**पेण : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने आणि वादळी वाऱ्याने पेण तालुक्यातील खारेपाट परिसरातील शिर्की येथे मोठे नुकसान झाले आहे. मिठशेतीचे बांध फुटल्याने सुमारे दीडशे एकर क्षेत्रातील मिठउत्पादनावर परिणाम झाला असून हजारो गोण्या मीठ पावसाच्या पाण्यात भिजले आहेत. त्याचबरोबर शासकीय भात खरेदी केंद्रातील मोठ्या प्रमाणावरील भातही पावसामुळे भिजल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



शिर्की येथील सद्गुरू कृपा नाविन्यपूर्ण सहकारी संस्थेच्या संचालिका वंदना म्हात्रे आणि संचालक कल्पेश पाटील हे सुमारे दीडशे एकर क्षेत्रात समुद्राचे खारे पाणी साठवून नैसर्गिक पद्धतीने मीठ उत्पादन करतात. वर्षभर शेकडो कामगारांच्या मेहनतीने तयार झालेले मीठ पावसाळ्यानंतर विक्रीसाठी मोठ्या राशींमध्ये प्लास्टिक आच्छादनाखाली साठवून ठेवण्यात आले होते.

मात्र, गेल्या काही दिवसांतील मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मिठशेतीचे बांध उध्वस्त झाले. त्यामुळे साठवून ठेवलेल्या हजारो गोण्या मीठ पावसात भिजले. वर्षभराच्या परिश्रमावर पाणी फिरल्याने संस्थेला मोठा आर्थिक फटका बसला आहे.याचबरोबर, कल्पेश पाटील यांच्या मत्स्यव्यवसायालाही मोठे नुकसान सहन करावे लागले. मुसळधार पावसामुळे मत्स्यतलावातील मासे वाहून गेल्याने त्यांच्यासमोर आणखी आर्थिक संकट उभे राहिले आहे.

दरम्यान, सद्गुरू कृपा सहकारी भात खरेदी केंद्रात शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आलेला मोठ्या प्रमाणावरील भातही पावसाच्या पाण्यात भिजल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे शेतकरी आणि संस्था या दोघांनाही मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी संस्थेचे संचालक कल्पेश पाटील यांनी केली आहे.

## पोलीस पाटलाला मारहाणप्रकरणी तिघांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा

**माणगाव : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटील पांडुरंग दिवकर यांना सरकारी कामकाज बजावत असताना मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी न्यायालयाने तीन आरोपींना दोन वर्षे साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच प्रत्येक आरोपीस तीन हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

या प्रकरणात फिर्यादी पांडुरंग दिवकर यांनी आरोपी विनोद कासकर याच्याविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पोलीस ठाण्यात हजर राहण्याची समज देण्यासाठी दिवकर हे आरोपीच्या घरी गेले असता, त्यांना हाताबुयांनी मारहाण करण्यात आली तसेच शिवीगाळ करण्यात आली. या तक्रारीवरून रोहा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक आर. एस. रोडे यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केला. सुनावणीदरम्यान फिर्यादी पोलीस पाटील पांडुरंग दिवकर, पंच आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. सादर झालेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी विनोद कासकर, दिपेश न्हावकर आणि दिपक न्हावकर यांना दोषी ठरवत दि. ८ जुलै रोजी दोन वर्षे साध्या कारावासाची व प्रत्येकी ₹३,००० दंडाची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अँड. रूपेश अरविंद महाकाळ यांनी प्रभावी बाजू मांडली. तसेच तपास अधिकारी आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले.

## पर्यटकांच्या मदतीने रस्ता केला मोकळा

**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळी पॉईंट भागातील रस्त्यांवर अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडलेली आहेत.काही भागात पालिका कर्मचारी वर्ग पोहचू शकाल नाही.तर अश्या एका पॉईंट कडे जाणाऱ्या रस्त्यावरील पडलेले झाड पर्यटकांच्या आणि अश्वचालकांच्या मदतीने रोड च्या बाजूला करीत हा रस्ता रहदारीसाठी मोकळा करण्यात आला.

माथेरान पर्यटनस्थळी पावसाने काहीशी विश्रांती घेतली आहे.पाऊस जरी नसला तरी विकेंडला पर्यटक संख्या मात्र मोठया प्रमाणावर आहे.आठवड्याभरात पडलेल्या कोसळधारेमुळे आणि सोसाट्याच्या वाहत असलेल्या वाऱ्यामुळे अनेक परिसरात भलीमोठी झाडे उन्मळून पडली आहेत.

लांबवर असलेल्या अनेक पॉईंट भागात नगरपालिका कर्मचारी गेले नसल्याने येथील अश्वचालकांनी



पर्यटकांच्या मदतीने रस्त्यावर पडलेले एक मोठे झाड बाजूला करीत रस्ता रहदारी करिता मोकळा केला.माथेरान पर्यटनस्थळी येणारे पर्यटक देखील माथेरानवर निस्सीम प्रेम करीत असतात.येथे अश्वचालकांना रस्ता मोकळा करून देण्यासाठी त्यांनी लागलीच मदतीचा हात देऊन रस्ता मोकळा केला.येथे अश्वचालकांनी देखील त्यांचे आभार मानले.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याकरिता ३१ जुलै अंतिम मुदत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यात उत्पादनावर आधारित सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२६ व रब्बी हंगाम २०२६-२७ या एक वर्षाकरिता अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्यानुसार रायगड जिल्ह्यासाठी इफको टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांची एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. ही योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक असून योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी दिली आहे.



अधिसूचित पिकांसाठी खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत पात्र आहेत. यावर्षी ही योजना राबवताना ई-पिक पाहणी म्हणजेच लागवड केलेल्या पिकाची नोंदणी डिजिटल क्रॉप सर्वे या अॅपवर करणे बंधनकारक केले आहे. तसेच शेतकरी ओळखपत्र क्रमांक (AgriStack Farmer ID) ही बंधनकारक करण्यात आला आहे. ई-पिक पाहणी आणि प्रत्यक्ष काढलेला विमा यामध्ये तफावत आढळल्यास विमा कोणत्याही पातळीवर रद्द करण्यात येणार आहे व विमा हप्ता रक्कम जप्त करण्यात येईल.

शेतकरी ओळखपत्र क्रमांक (AgriStack Farmer ID) बंधनकारक असल्याने केवळ लागवडीखाली असलेल्या अधिसूचित पिकांचाच विमा काढता येईल यावर्षीच्या योजनेत एक रुपयात विमा हप्ता मिळणार नाही अधिसूचित पिकांसाठी हा हप्ता २% आहे मात्र विमा कंपन्यांनी संभाव्य नुकसान भरपाईचा धोका लक्षात घेऊन विमा हप्ता कमी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात भात पिकासाठी प्रती हेक्टरी ६५० रु. व नाचणी पिकासाठी प्रती हेक्टरी ४०० रु. इतका विमा हप्ता रायगड जिल्ह्यासाठी आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, आधार कार्ड, अधिसूचित पिकाचे पेरणी केलेले स्वयंघोषणापत्र, भाडेपट्टा करार असलेल्या शेतकऱ्यांचा करारनामा, संमती पत्र, बँक पासबुक प्रत इत्यादी कागदपत्र आवश्यक आहेत. योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून ई-पिक पाहणी व शेतकरी ओळखपत्र क्रमांक (AgriStack Farmer ID) असणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## खोपोली नगरपरिषदेतर्फे नगरसेवकांसाठी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेबाबत माहिती सत्र

**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येणाऱ्या 'SIR' (Special Intensive Revision मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी खोपोली शहरात व्हावी, या उद्देशाने आज खोपोली नगरपरिषद कार्यालयाच्या सभागृहात सर्व नगरसेवक व नगरसेविकांसाठी विशेष माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या माहिती सत्रामध्ये मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी लोकप्रतिनिधींची भूमिका, नागरिकांचे सहकार्य आणि प्रशासनाचा समन्वय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



बैठकीदरम्यान श्री. सोहन गुरव यांनी 'SIR' मोहिमेची सविस्तर माहिती देत सांगितले की, बीएलओ (BLO) अधिकारी घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करत असून दुबार नावे वगळणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे कमी करणे तसेच नव्याने पात्र ठरलेल्या मतदारांची नोंदणी करण्याचे काम सुरू आहे.

तसेच शहरातील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे यासाठी सर्व नगरसेवकांनी आपल्या-आपल्या प्रभागात जनजागृती करून नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी नवीन मतदार नोंदणी, फॉर्म क्रमांक ६, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया तसेच इतर तांत्रिक बाबींवर उपस्थित नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांची BLO श्री. मुझफ्फर मांडलेकर यांनी सविस्तर उत्तरे देत शंकांचे निरसन केले.

खोपोली शहरातील एकही पात्र नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये तसेच मतदार यादी पूर्णपणे अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत व्हावी, यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी खोपोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे,मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, सभापती, नगरसेवक, नगरसेविका, महसूल विभागाचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## जावळी येथे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय वस्तू वाटप, गुणगौरव सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

श्री गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ जावळी या शिक्षण संस्थेमधून आयएस ऑफिसर,आयपीएस ऑफिसर,डॉक्टर्स झालेले विद्यार्थी पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभावे अशी ईच्छा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जावळी हायस्कुल येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व माणगाव तालुक्यातील गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ,जावळी यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय वस्तूंचे मोफत वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्याहस्ते शनिवार दि. ११ जुलै रोजी महाराष्ट्र भूषण तिर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी इंग्लिश स्कूल जावळी येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात मंत्री आदिती तटकरे यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते शेखर देशमुख,शांताराम भोरावकर,भागोजी डवले,राजिप सदस्य अस्लम



राऊत,राष्ट्रवादीचे प्रदेश युवक सचिव दिपक जाधव,जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे,माणगाव पंचायत समिती उपसभापती मनीषा मालोरे,पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम,अलका केकाणे,माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण,उणेगाव सरपंच शुभांगी शिर्के,शैलेश भोनकर,रत्नाकर उभारे,संदीप खरंगटे,जयंत बोडेरे,उदय अधिकारी,महेश महाजन,सिद्धांत देसाई, राजेंद्र शिर्के,वैष्णव साठे,इकबाल हर्णेकर,नजीर धनसे,मच्छिंद्र म्हस्के,होडगाव सरपंच बळीराम खाडे,सागर भोनकर,विनोद वाघमारे,लोणशी सरपंच सिद्धेश पालकर,योगेश गुगळे,दिनेश केकाणे,विलास यादव,संदेश गुगळे आदींसह राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते पालकवर्ग,शिक्षकवर्ग,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री आदिती तटकरे यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत म्हणाल्या कि,अजितदादा यांचा २२ जुलै हा जयंती दिवस असून त्यादिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दादांना वृक्ष लागवडीची विशेष आवड होती त्यामुळे वृक्ष रोपणाचा कार्यक्रम आपण दादांच्या स्मृती प्रित्यर्थ घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना मंत्री तटकरे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील हुशार असतात. या विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांसारखी हवीतशी सोय नसते. तरी त्या परिस्थीवर मत करीत आपला ग्रामीण भागातील विद्यार्थी पुढे जात असतो. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळातही विशेष लक्ष घाला.

कार्यक्रमात मंत्री आदिती तटकरे यांच्याहस्ते दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच जावळी हायस्कुलच्या नवनिर्वाचित मुख्याध्यापिका नेहा सतीश केकाणे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन उणेगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के यांनी केले. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## पूरग्रस्त नागोठण्याची आमदार अनिकेत तटकरेंनी केली पाहणी; तातडीच्या मदतकार्याचे निर्देश

**नागोठणे : बातमीदार**

कोकण विभागाचे विधान परिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांनी गुरुवारी सायंकाळी पूरग्रस्त नागोठणे व वाकण परिसराची पाहणी करून नागरिक व व्यापाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. बाजारपेठ, कोळीवाडा, मोहल्ला परिसर, खुमाचा नाका तसेच एस.टी. स्थानकासमोरील भागात त्यांनी कार्यकर्त्यांसह प्रत्यक्ष फेरफटका मारला.

यावेळी आमदार अनिकेत तटकरे यांच्या समवेत राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन, नरेंद्रशेठ जैन, भाईसाहेब टके, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच



व विद्यमान सदस्य डॉ मिलिंद धात्रक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, सदस्या पूनम काळे, नागोठणे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश जैन, उपाध्यक्ष अनिल काळे, दिलीप शहासने, बिकानेर मिठाई व्यापारी प्रतिनिधी रतन देवासी, अखलाक पानसरे, अतुल काळे, जोहेब कुरेशी, प्रथमेश काळे, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे, प्रथमेश काळे, बिपीन सोष्टे, मंगेश तेरडे, शैलेश रावकर, सिराज पानसरे, रुचिर मोरे, मोहन नागोठणेकर, विजय शहासने, अॅड. श्रीकांत रावकर, मनोज टके, अॅड. रमेश जाधव, गुड्डू मोदी, रोशन पारंगे, समीर भिकन, अंकुश ताडकर, केतन भोय, आलोक काळे, बंटी चोपडा आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, व्यापारी व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पूरग्रस्त भागाची पाहणीनंतर आमदार अनिकेतभाई तटकरे यांनी पाटबंधारे, महसूल, वीज वितरण व पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना देत महसूल विभागास पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर भरपाई देण्याचे निर्देश दिले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोरभाई जैन यांनी अंबा नदीतील गाळ काढणे, पूरग्रस्त व्यापाऱ्यांना विमा दाव्यांबाबत मदत करणे व गावासाठी रिलायन्स कंपनी कडून शुद्ध पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे आदी मागण्या मांडल्या. पूरपूर्व इशारा प्रणालीबाबत महसूल विभागाने यंदा निष्काळजीपणा केल्याची तक्रार व्यापारी वर्गाने केली.

## मृत मुजावरच्या कुटुंबीयांना शासनाची चार लाखांची मदत

**खोपोली, खालापूर, चौक : प्रतिनिधी**

मुंबई पुणे महामार्गावरील बोरघाटात दि ८ जुलै रोजी मुसळधार पावसाने रस्त्याच्या मधोमध महाकाय झाड उन्मळून पडळल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.



प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते झाड हटविण्याचे कार्य करीत असताना शिळफाटा (खोपोली) येथील सामाजिक कार्यकर्ते अमन मुजावर यांच्या अंगावर झाडाची मोठी फांदी कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची दखल घेत आमदार भास्कर जाधव यांनी विधानसभेत आवाज उठवला होता व सेवाभावी काम करणाऱ्या स्वयंसेवेकाच्या कुटूंबाला आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाचे दरवाजे ठोठावले होते.

आमदार भास्कर जाधव यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून खालापूर तहसीलदार अभय चव्हाण व स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांनी अमन मुजावर याच्या खोपोली शिळफाटा येथील त्याच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांना ४ लाख रुपयांची शासकीय मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

# स्पेन १६ वर्षांनंतर उपांत्य फेरीत

## मिकेल मेरिनोचा निर्णायक गोल, बेल्जियमचे आव्हान संपुष्टात



**इंग्लवुड, कॅलिफोर्निया : वृत्तसंस्था**

२०१० मध्ये वर्ल्डकप उंचावणाऱ्या स्पेनला त्यानंतर साजेशी कामगिरी करता आली नव्हती, परंतु यंदा त्यांनी फिफा फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. ८८व्या मिनिटाला मिकेल मेरिनोच्या गोलने स्पेनला बेल्जियमवर २-१ असा विजय मिळवून दिला. याच मेरिनोने पोर्तुगालविरुद्ध ९०+१ मिनिटाला गोल करून स्पेनला उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवले होते आणि आज त्याने बेल्जियमला बाद केले. वर्ल्डकपच्या संपूर्ण इतिहासात दोन बाद फेरीच्या सामन्यांच्या शेवटच्या ५ मिनिटांत दोन विजयी गोल करणारा तो एकमेव खेळाडू आहे.

फॅबियन रुईजने ३०व्या मिनिटाला गोल करून स्पेनला आघाडी मिळवून दिली होती आणि त्याला बेल्जियमकडून चार्ल्स डी केटेलारेने ४१ व्या मिनिटाला उत्तर दिले. पहिला हाफ १-१ असा बरोबरीत सुटल्यानंतर मध्यंतरात दोन्ही संघ बचावात्मक पवित्र्यात दिसले. दरम्यान, या सामन्यात लामिने यमालने विक्रमाला गवसणी घातली. वयाच्या १८ वर्षे ३६३ दिवसांत त्याने आपल्या फिफा वर्ल्ड कप स्पर्धेत कारकिर्दीत आतापर्यंत सहा सामने खेळले आहेत. १९ वर्षांचा होण्यापूर्वी वर्ल्ड कप मध्ये सर्वाधिक सामने खेळणारा तो युवा खेळाडू ठरला. त्याने उत्तर आयर्लंडच्या नॉर्मन व्हाइटसाइडचा विक्रम मोडला, ज्याने १९ वर्षांचे होण्यापूर्वी पाच सामने खेळले होते.

## वैभव सूर्यवंशीला गंभीरने सुनावले?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय टी-२० संघ सध्या अतिशय बिकट परिस्थितीत आहे. श्रेयस अय्यरला कर्णधारपद मिळाल्यापासून भारतीय संघाने एकही सामना जिंकलेला नाही. टीम इंडियाने आधी आयर्लंडविरूद्धची मालिका २-०ने गमावली. त्यानंतर आता इंग्लंडविरूद्धच्या मालिकेत ४ सामन्यानंतर टीम इंडिया ३-०ने पिछाडीवर आहे. अशा परिस्थितीत प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांना बीसीसीआयला काही प्रश्नांची उत्तरे द्यावे लागतील. गौतम गंभीर टीम इंडियाच्या कामगिरीवर प्रचंड नाखुश असल्याचे स्पष्ट दिसून आले होते. तशातच आता एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यात गौतम गंभीरने वैभव सूर्यवंशीला भरमैदानात सर्वांसमोर सुनावल्याचा दावा केला जात आहे.

**व्हिडीओ व्हायरल**



टीम इंडिया आयर्लंड दौऱ्यावर गेल्यापासूनच वैभवला सलामीवीर म्हणून प्लेइंग ११ मध्ये खेळवा, असा सूर दिसून येत होता. त्याला आयर्लंडविरूद्धच्या दोन सामन्यात खेळू दिले नाही.

## भारतीय संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये बदल अपेक्षित

**मुंबई : प्रतिनिधी**

आयर्लंड आणि इंग्लंडविरूद्ध भारतीय टी-२० संघाचा दारूण पराभव झाला आहे. त्यानंतर आता भारताच्या कोचिंग स्टाफमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे. एका वृत्तानुसार हेड कोच गंभीरच्या सपोर्ट स्टाफमधील दोन सदस्यांवर टांगती तलवार आहे. यात एका वरिष्ठ सपोर्ट स्टाफ सदस्याची आयपीएलच्या एका फ्रेंचायजीसोबत चर्चादेखील सुरू आहे. ते या फ्रेंचायजीसोबत लवकरच जोडले जाऊ शकतात. अजून एक कोचिंग स्टाफ मेंबर भारतीय संघाची साथ सोडण्याची शक्यता आहे.




भारतीय क्रिकेट नियामक मंडळ ऑगस्टमध्ये श्रीलंकेच्या दौऱ्यापूर्वी सध्याच्या कोचिंग स्टाफची समीक्षा करण्याची शक्यता आहे. याचदरम्यान झिम्बाब्वेविरूद्धच्या टी २० मालिका आणि एशियन गेम्स २०२६ साठी व्हीव्हीएस लक्ष्मणच्या नेतृत्वात वेगळा कोचिंग स्टाफ नियुक्त करण्याचा निर्णय झाला आहे. यामुळेदेखील अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. गौतम गंभीरच्या सपोर्ट स्टाफसोबत बीसीसीआयने दोन अधिक एक असा तीन वर्षाचा करार केला होता. सुरूवातीची दोन वर्षे पूर्ण झाल्यावर कोच आणि इतर दोघांना एका वर्षाने करार वाढण्याचा पर्याय आहे. भारतीय संघ सध्या आयर्लंडविरूद्धच्या मालिकेत पराभव झाला आहे. इंग्लंडविरूद्धच्या मालिकेतदेखील भारत व्हाईट वॉशच्या उंबरठ्यावर आहे.

असं असलं तरी या कामगिरीचा आणि सपोर्ट स्टाफ बदलण्याचा थेट संबंध असल्याचे नाकारण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून कोचिंग स्टाफमध्ये अंतर्गत निर्माण झालेल्या मुद्द्यांमुळे हा निर्णय घेतला जाण्याची दाट शक्यता आता वर्तवली जात आहे. बीसीसीआयने झिम्बाब्वेविरूद्धच्या टी २० मालिकेसाठी गंभीर आणि त्यांच्या सपोर्ट स्टाफला जबाबदारी दिलेली नाही. त्याच्या ऐवजी व्हीव्हीएस लक्ष्मण या दौऱ्यावर हेड कोच असणार आहे. त्यानंतर जपानमध्ये होणाऱ्या एशियन गेम्समध्ये भारतीय संघाच्या प्रशिक्षक पदाची जबाबदारीदेखील तेच सांभाळणार आहेत.

दरम्यान, झिम्बाब्वे दौऱ्यावर व्हीव्हीएस लक्ष्मणला का पाठवण्यात येणार आहे हे अजूनही क्रीडा रसिकांना कळत नाही. त्यांना एशियन गेम्ससाठी पाठवणेदेखील कल्पनेच्या पलीकडचा निर्णय वाटत आहे.

## सचिन-अंजलीसोबत दिसला शुबमन गिल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाच्या कसोटी आणि वनडे संघाचा कर्णधार शुबमन गिलने क्रिकेटचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर याच्यासोबत विम्बल्डनच्या सेंटर कोर्टवरील रॉयल बॉक्समधून पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीतील सामन्यांचा आनंद घेतला. सचिन तेंडुलकरसोबत त्याची पत्नी अंजली तेंडुलकरही उपस्थित होती.

गिल हा रॉयल बॉक्समधून विम्बल्डनचा सामना पाहणारा चौथा भारतीय कर्णधार ठरला. यापूर्वी सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनाही हा मान मिळाला होता तसेच २०२६ मध्ये विम्बल्डनला भेट देणारा तो चौथा भारतीय क्रिकेटपटू ठरला. यापूर्वी शिखर धवन, दीप्ती शर्मा आणि सचिन तेंडुलकर यांनीही विम्बल्डनला भेट दिली होती. वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लारा विंबल्डनच्या रॉयल बॉक्समध्ये इसाबेल बिसनाथ हिच्यासोबत दिसला. इसाबेल ही त्रिनिदाद आणि टोबॅगोची मॉडेल असून व्यवसायाने वकील आहे.

## हरमनप्रीत कौरने घडवला इतिहास! लॉर्ड्सच्या मैदानावर रेकॉर्ड करणारी पहिलीच भारतीय फलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लॉर्ड्सच्या मैदानावर आजवर अनेक ऐतिहासिक सामने खेळवले गेले आहेत, पण गेल्या १४२ वर्षांपासून या मैदानावर महिलांचा एकही आंतरराष्ट्रीय कसोटी सामना खेळवला गेला नव्हता. अखेर या मैदानावर पहिला आणि ऐतिहासिक कसोटी सामना खेळण्याचा मान भारतीय महिला संघाला मिळाला आहे. लॉर्ड्सच्या मैदानावरील भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांच्या सामन्यात भारतीय संघातील फलंदाजांनी पहिल्याच दिवशी दमदार फलंदाजी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर व स्मृती मानधनाने दमदार अर्धशतकं झळकावली. या सामन्यात अर्धशतकी खेळी करताच हरमनप्रीत कौरने सचिन तेंडुलकर व विराट कोहलीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

या सामन्यातील सुरुवातीला भारतीय संघाला दोन मोठे धक्के बसले होते. यस्तिका भाटीया आणि शफाली वर्मा स्वस्तात माघारी परतले होते. त्यानंतर स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्जने मिळून भारताचा डाव सावरला. स्मृतीने अर्धशतकी खेळी केल्यानंतर, हरमनप्रीत कौरने देखील अर्धशतक झळकावलं. यासह ती लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर वनडे, टी-२० आणि कसोटी क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकवणारी पहिलीच भारतीय क्रिकेटपटू ठरली आहे. हा रेकॉर्ड आजवर विराट कोहली आणि सचिन तेंडुलकरसारख्या दिग्गज



फलंदाजांनादेखील करता आलेला नाही. यासह ती लॉर्ड्सच्या मैदानावर तिन्ही फॉरमॅटमध्ये अर्धशतकी खेळी करणारी जगातील चौथी फलंदाज ठरली आहे. या यादीत तिच्यापुढे केवळ युनिस खान, महेला जयवर्धने आणि कुमार संगकारासारख्या दिग्गज खेळाडूंचं नाव आहे. आता या दिग्गजांच्या यादीत हरमनप्रीत कौरचं नाव जोडलं गेलं आहे.

या सामन्यातील पहिल्या दिवशी भारतीय फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला. भारतीय संघाने ७४.५ षटकात २८५ धावा केल्या आहेत. भारताकडून स्मृती मानधनाने १०८ चेंडूंचा सामना करत ८३ धावांची खेळी केली. तिचं शतक थोडक्यात हुकलं. हा तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ३०० वा सामना आहे. यासह ती सर्वात कमी वयात ३०० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी जगातील पहिलीच खेळाडू ठरली आहे. स्मृतीने ५० चेंडूंचा सामना करत अर्धशतकी खेळी केली. यासह ती कसोटी क्रिकेटमध्ये लॉर्ड्सच्या मैदानावर अर्धशतकी खेळी करणारी पहिलीच महिला क्रिकेटपटू ठरली.


हरमनप्रीत कौरने १२१ चेंडूंचा सामना करत ५८ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ७ चौकार खेचले. तर दीप्ती शर्माने देखील ८७ चेंडूंचा सामना करत ५७ धावांची खेळी केली. तर इंग्लंडकडून गोलंदाजी करताना सोफी एक्लेस्टनने सर्वाधिक ३ गडी बाद केले. तर लॉरेन फिलर आणि एस्सी वाँगने प्रत्येकी २-२ गडी बाद केले. भारताचा डाव २८५ धावांवर आटोपला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या इंग्लंडने पहिल्या दिवसाच्या समाप्तीपर्यंत ५ षटकांत १ गडी बाद १३ धावा केल्या.

## जोकोव्हिचचे ग्रँडस्लॅम जेतेपदाचे स्वप्न भंगले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कारकिर्दीतील विक्रमी २५व्या ग्रँडस्लॅम जेतेपदासाठी प्रयत्नशील नोव्हाक जोकोव्हिचला विम्बल्डन स्पर्धेच्या सेमी फायनलच्या लढतीत धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागले. सेमी फायनलच्या लढतीत यानिक सिनरने जोकोव्हिचचा ६-४, ६-४, ६-४ असा धुव्वा उडवला. ३९ वर्षीय जोकोव्हिच २५व्या ग्रँडस्लॅम जेतेपदासाठी आतूर होता.

क्वार्टरफायनलच्या प्रदीर्घ काळ चाललेल्या लढतीचा थकवा जोकोव्हिचला सेमी फायनलच्या लढतीतही जाणवत होता. विजिगीषु वृत्ती आणि अद्भुत फिटनेस यासाठी ओळखल्या



जाणाऱ्या जोकोव्हिचला विक्रमी जेतेपदासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. फायनलमध्ये सिनरसमोर अलेक्झांडर झरेव्हचे आव्हान असणार आहे.

टेनिस विश्वात ऑस्ट्रेलियन ओपन, फ्रेंच ओपन, विम्बल्डन आणि युएस ओपन अशा चार मानाच्या ग्रँडस्लॅम स्पर्धा होतात. २४ जेतेपदांसह जोकोव्हिच पुरुष टेनिसपटूंमध्ये जेतेपदांच्या बाबतीत अव्वल स्थानी आहे. महिला टेनिसपटू मार्गारेट कोर्ट यांच्या नावावर २४ ग्रँडस्लॅम जेतेपदं आहेत. पुरुष टेनिसपटूंमध्ये राफेल नदालच्या नावावर २२ तर रॉजर फेडररच्या नावावर २० जेतेपदं आहेत. या तिघांनी गेले दोन दशकं ग्रँडस्लॅम जेतेपदांवर सद्दी राखली आहे. नदाल आणि फेडरर दोघेही निवृत्त झाले आहेत. मात्र चाळिशीच्या उंबरठ्यावर असलेला जोकोव्हिच आजही ग्रँडस्लॅम जेतेपदाच्या शर्यतीत आहे. कारकिर्दीत सुरुवातीला जोकोव्हिचला दम्याचा त्रास होता. त्यावर मात करुन त्याने फेडरर आणि नदालची मक्तेदारी मोडून काढत स्वतःचे स्थान निर्माण केले.

## श्रेयसचे कर्णधारपद धोक्यात?

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय संघाने काही महिन्यांपूर्वी भारतात झालेल्या आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. ही स्पर्धा झाल्यानंतर बीसीसीआयने सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरुन काढून टी-२० संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवली. पण श्रेयसला कर्णधार म्हणून आपली छाप सोडता आलेली नाही. ही कामगिरी अशीच सुरु राहिली तर श्रेयसचा कर्णधारपदावरुन पत्ता कट होऊ शकतो.

आधी आयर्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला २-०ने पराभवाचा सामना करावा लागला. तर इंग्लंडविरुद्धच्या ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघ ३-० ने पिछाडीवर आहे. श्रेयसला कर्णधार म्हणून ६ पैकी एकही सामना जिंकता आलेला नाही. हार्दिक पांड्या भारतीय संघातील प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे, पण सध्या तो दुखापतीमुळे संघाबाहेर आहे. सूर्यकुमार यादवआधी हार्दिक संघाचा कर्णधार होता. त्यामुळ तो जर परतला तर कर्णधारपदाची जबाबदारी पुन्हा एकदा हार्दिककडे सोपवली जाऊ शकते.

## अर्लिंग हालंडचे भावस्पर्शी कृत्य

### मृत चाहत्यासाठी भावूक पत्र आणि जर्सी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप २०२६ मध्ये नॉर्वेला क्वार्टरफायनलमध्ये पोहोचवणाऱ्या अर्लिंग हालंडने मैदानाबाहेरही चाहत्यांची मने जिंकली आहेत. रस्ते अपघातात प्राण गमावलेल्या सहा वर्षीय बालकाच्या कुटुंबीयांना हालंडने भावूक पत्र आणि स्वाक्षरी केलेली जर्सी पाठवली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या पत्राने चाहत्यांचे डोळे पाणावले आहेत.



फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत सध्या एकच नाव सध्या तुफान चर्चेत आहे, ते म्हणजे अर्लिंग हालंड. नॉर्वेला क्वार्टरफायनलमध्ये पोहोचवण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली आहे. मैदानावर दमदार कामगिरी करुन त्याने चाहत्यांची मनं जिंकली आहेत. यासह मैदानाबाहेरही त्याने असं काही केलं आहे, जे पाहून डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहणार नाही. अर्लिंग हालंडने रस्ते अपघातात आपला जीव गमावणाऱ्या सहा वर्षीय चाहत्याच्या कुटुंबीयांना भावूक करणारं पत्र लिहिलं आहे. यासह खेळाडूंची ऑटोग्राफ असलेली जर्सीदेखील दिली आहे.

हालंड आणि त्याच्या कुटुंबाने या पत्रात लिहिले की, "प्रिय माता-पिता मॅथियास आणि तिरिल. डेनिसच्या निधनाबद्दल आम्हा सर्वांच्या वतीने तुमच्या कुटुंबीयांप्रति मनापासून संवेदना. आम्ही स्वतःदेखील माता-पिता आणि भाऊ बहीण आहोत. त्यामुळे तुम्ही सध्या कोणत्या वेदनेतून जात असाल, याची आम्ही कल्पनाही करु शकत नाही. या कठीण काळात आम्ही तुमच्या पाठीशी उभे आहोत. आम्हाला समजलं की, डेनिसचे फुटबॉलवर खूप प्रेम होते. त्यामुळे आम्ही ही भेट तुम्हाला पाठवू इच्छितो." हालंड कुटुंबाने पाठवलेल्या या पत्राचा फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

## डिसेंबरमध्ये टीम इंडियाचा नेपाळ दौरा

### बीसीसीआयचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ नेपाळ (CAN) यांनी द्विपक्षीय क्रिकेट संबंधांना आणखी बळ देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार इंडिया ए संघ यंदाच्या डिसेंबरमध्ये नेपाळ दौऱ्यावर जाणार असून दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात येणार आहे. कॅनने अधिकृत निवेदन जारी करत या मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे.

कॅनचे अध्यक्ष चतुर बहादूर चंद, सचिव पारस खडका आणि बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांच्यात झालेल्या बैठकीनंतर या मालिकेवर शिक्कामोर्तब करण्यात आले.



सर्व सामने नेपाळमधील कीर्तिपूर येथील त्रिभुवन विद्यापीठाच्या टीयू इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर खेळवले जाणार आहेत.

ही मालिका नेपाळ क्रिकेटसाठी मोठी संधी मानली जात आहे. 'इंडिया ए' संघात आयपीएलमध्ये चमक दाखवणारे अनेक युवा खेळाडू तसेच भारतीय वरिष्ठ संघासाठी खेळलेले काही अनुभवी क्रिकेटपटूही असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेपाळच्या खेळाडूंना उच्च दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळण्याचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे.

गेल्या काही वर्षांत नेपाळ क्रिकेटने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय प्रगती केली आहे. सलग दोन टी-२० विश्वचषकांसाठी पात्र ठरलेल्या नेपाळने २०२४ च्या स्पर्धेत विजय मिळवता आला नव्हता. मात्र, २०२६ च्या टी-२० विश्वचषकात त्यांनी दमदार पुनरागमन करत स्कॉटलंडचा पराभव केला. इतकंच नाही, तर इंग्लंडसारख्या बलाढ्य संघालाही त्यांनी कडवी झुंज दिली. अत्यंत रोमांचक सामन्यात नेपाळला केवळ ४ धावांनी पराभव स्वीकारावा लागला, पण त्यांच्या कामगिरीने क्रिकेटविश्वाचं लक्ष वेधून घेतलं.

डिसेंबरमध्ये होणारी ही मालिका भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांसाठी महत्त्वाची ठरणार आहे. भारताच्या युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय वातावरणात स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळेल, तर नेपाळला बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळून आगामी मोठ्या स्पर्धांसाठी तयारी करण्याची संधी मिळणार आहे.

**मालिकेचे वेळापत्रक**

**९ डिसेंबर पहिला टी-२०**
**११ डिसेंबर दुसरा टी-२०**
**१३ डिसेंबर तिसरा टी-२०**

## इंग्लंड फुटबॉलपटूंना रिकव्हरीसाठी हळदीचा आधार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टर्मरिक लाते अशा गोंडस नावाने पदार्थ विकण्याची परंपरा अमेरिकेने दशकभरापूर्वी सुरू केली. त्यानंतर अमेरिकेत पेवच फुटलं. अमेरिकेने अनुसरलेली ही हळद परंपरा यंदाच्या वर्ल्डकपमधल्या इंग्लंड संघाने अवलंबली आहे. प्रचंड दमवणारा असा सामना खेळल्यानंतर खेळाडूंची रिकव्हरी प्रक्रिया सुरू होते. दोन सामन्यांमधला वेळ अतिशय कमी असल्याने प्रत्येक संघ रिकव्हरीसाठी वेगवेगळे प्रयोग आणि पर्याय उपयोगात आणतो आहे. इंग्लंड संघाने यलो पाव्हडर अर्थात हळदीला खेळाडूंच्या रिकव्हरी प्रक्रियेत स्थान दिले आहे.



मेक्सिकोविरुद्धच्या अझटेका या हाय ॲल्टिट्यूड ठिकाणी झालेल्या सामन्यानंतर इंग्लंडचे खेळाडू टर्मेरिक कनोकेशन्स अर्थात हळदीचं पाणी पित असल्याचं स्पष्ट झालं आहे. सतत धावल्यामुळे स्नायूंना सूज होण्याची शक्यता असते. असं होऊ नये यासाठी इंग्लंड संघव्यवस्थापनाने हळदीच्या पाण्याचा समावेश आहारात केला आहे. हळदीच्या बरोबरीने आलं आणि ओमेगा फिश ऑईल यांचाही समावेश करण्याची सूचना खेळाडूंना देण्यात आली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com